❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २५८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# एमपीएससी सचिवांच्या तोंडाला काळे फासले

## पेपरफुटीच्या आरोपांवर संभाजी ब्रिगेड आक्रमक, अध्यक्षांनाही इशारा- कारवाई झाकी है, अध्यक्ष अभी बाकी है!

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांविरोधातील विद्यार्थ्यांचा संताप आता अधिक तीव्र होताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी ही कारवाई केल्याचे सांगण्यात येत असून, नवी मुंबईत हा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. सामंत आणि राणे या संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासल्याचे सांगितले जात आहे.

एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या कथित पेपरफुटीच्या प्रकरणावरून गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. विविध ठिकाणी आंदोलने होत असून, परीक्षा प्रक्रिया पारदर्शक करण्याची तसेच कथित गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडने थेट एमपीएससीच्या सचिवांविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रवक्ते




संतोष शिंदे यांनी या कारवाईचे समर्थन करताना ती महाराष्ट्रातील एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संतापाची प्रतिक्रिया असल्याचा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, राज्यातील सुमारे 25 लाख एमपीएससी उमेदवार आणि महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.

"एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचा आक्रोश सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे," अशी भूमिका संभाजी ब्रिगेडने मांडली. एमपीएससीच्या कारभारावर गंभीर आरोप करताना संघटनेने आयोगाच्या प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शिंदे यांनी यावेळी सरकारवरही जोरदार टीका केली. प्रश्नपत्रिका फुटण्याचे प्रकार समोर येत असतील, परीक्षा रद्द किंवा पुढे ढकलण्याची वेळ येत असेल आणि त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसत असेल, तर याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संभाजी ब्रिगेडने या घटनेनंतर एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिव यांच्या राजीनाम्याची मागणी आणखी तीव्र केली आहे. एमपीएससीचा कारभार सुधारला नाही आणि कथित गैरप्रकारांना आळा घातला गेला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. संतोष शिंदे यांनी, "आज केलेली कारवाई ही केवळ सुरुवात आहे. एमपीएससी अध्यक्ष आणि सचिवांनी तत्काळ राजीनामा दिला नाही तर पुढचा नंबर अध्यक्षांचा असेल," असा इशारा दिला. संभाजी ब्रिगेडने यापूर्वीही एमपीएससीच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. 3 ऑगस्ट रोजी औषध निरीक्षक पदाच्या कथित पेपरफुटीच्या निषेधार्थ राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर आंदोलन करण्यात आल्याचे संघटनेने सांगितले. त्यावेळी सरकार आणि आयोगाला इशारा देण्यात आला होता. मात्र, अपेक्षित कारवाई न झाल्याचा आरोप करत आता संघटनेने थेट अधिकाऱ्यांविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

सरकारी नोकरी मिळवण्यासाठी अनेक वर्षे तयारी करणारे विद्यार्थी परीक्षांच्या अनिश्चिततेमुळे मानसिक आणि आर्थिक तणावात येतात. एका परीक्षेसाठी हजारो विद्यार्थी अनेक महिने किंवा वर्षे तयारी करतात. परीक्षा रद्द झाली किंवा पेपरफुटीमुळे पुन्हा परीक्षा घ्यावी लागली, तर त्यांची संपूर्ण तयारी आणि वेळ वाया जातो. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा पारदर्शक आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. संतोष शिंदे यांनी तरुणांच्या वाढत्या मानसिक तणावाचा मुद्दाही उपस्थित केला. तरुणांच्या समस्या गांभीर्याने घेतल्या जात नसल्याचा आरोप करत त्यांनी एमपीएससी प्रशासन आणि सरकारवर निशाणा साधला. महेंद्र हरपाळकर हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव आहेत. डिसेंबर 2025 पासून ते या पदावर कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली आहे. यापूर्वी त्यांनी छत्रपती संभाजीनगरमधील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर काम केले आहे. हरपाळकर हे 1995 पासून प्रशासनात अधिकारी म्हणून कार्यरत असल्याचे सांगण्यात येते.

### विद्यार्थ्यांच्या वर्षांचे नुकसान झाल्याचा आरोप

एमपीएससीकडून परीक्षांच्या आयोजनात वारंवार अडथळे येत असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. कथित पेपरफुटीमुळे काही परीक्षा रद्द कराव्या लागतात, काही परीक्षा पुढे ढकलल्या जातात किंवा फेरपरीक्षा घेण्याची वेळ येते. याचा थेट परिणाम उमेदवारांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक भवितव्यावर होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

### कारवाई झाकी है, अध्यक्ष अभी बाकी है!

या घटनेनंतर संभाजी ब्रिगेडने आपली भूमिका अधिक तीव्र केली आहे. "आजची कारवाई ही झाकी आहे, अध्यक्ष अभी बाकी आहे," अशा शब्दांत संतोष शिंदे यांनी पुढील आंदोलनाचा इशारा दिला. त्यांच्या मते, एमपीएससीच्या माध्यमातून होणाऱ्या कथित गैरप्रकारांचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. प्रश्नपत्रिका फुटल्याच्या तक्रारी, परीक्षा रद्द होणे आणि फेरपरीक्षा यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

## थोडक्यात...

### दोन मंत्र्यांसमोर शिंदेंच्या आमदाराला रडू

नंदूरबार : दैनिक संध्या

नंदुरबार जिल्ह्यातील शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात महायुतीमधील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपातील दुजाभावावर बोलताना विधान परिषदेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांना चक्क व्यासपीठावरच रडू कोसळले. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत रघुवंशी यांच्या अश्रूंचा बांध फुटल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. शिवसेनेच्या मेळाव्यात बोलताना चंद्रकांत रघुवंशी यांनी नंदुरबारमधील निधी वाटपाचे गणित मांडले. जिल्ह्यात सध्या सत्ताधारी पक्षांचे 3 आमदार असून त्यापैकी 1 आमदार शिवसेनेचा आणि 2 आमदार भाजपचे असल्याचे त्यांनी सांगितले. सध्याच्या निकषांनुसार विधानसभेच्या आमदारांना निधी देण्यात येतो. त्यातील 20 टक्के निधी आमदारांच्या माध्यमातून वितरित केला जातो, तर उर्वरित निधीपैकी 30 टक्क्यांवर पालकमंत्र्यांचा अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले. उर्वरित निधीमध्ये विविध पक्षांच्या नेत्यांचा आणि लोकप्रतिनिधींचा विचार होतो. मात्र, या पद्धतीमुळे शिवसेनेच्या वाट्याला अत्यल्प निधी येत असल्याचा रघुवंशींचा आरोप आहे. "आज दुर्दैवाने मी आणि आमचे दादा 2 आमदार आहोत, पण आम्ही शिवसेनेला न्याय देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे," असे म्हणताना ते भावुक झाले.

### साऊंड सिस्टीम बंद करा : गुलाबराव पाटील

जळगाव : दैनिक संध्या

माझ्या पुतण्याच्या लग्नात घरचे लग्न असल्याने लोकांनी मला नाचायला सांगितले. पण डीजेच्या प्रचंड आवाजामुळे माझ्या कानात असा काही त्रास झाला की, मी एका कानाने 40 टक्के ऐकूच शकत नाही; तो कान आता रिपेअर होणे शक्य नाही. डीजे आणि डॉल्बी सिस्टीममुळे लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. म्हणूनच येत्या गणेशोत्सवात तरुणांनी डीजे न लावता पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करावा, असे राज्याचे पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे. मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, सण-उत्सव हे आनंदासाठी असतात, कोणाचे आरोग्य धोक्यात घालण्यासाठी नाहीत. प्रचंड आवाजामुळे कानाचे पडदे फाटणे, हृदयाची धडधड वाढणे असे गंभीर आजार उद्भवतात. तरुणांनी या धोक्याचे गांभीर्य ओळखून गणेशोत्सवात डीजेऐवजी ढोल-ताशा आणि पारंपरिक वाद्यांना प्राधान्य दिले तर ते समाजासाठी आणि आरोग्यासाठी उत्तम ठरेल. दहीहंडी हा हिंदूंच्या संस्कृतीशी आणि धार्मिक परंपरेशी जोडलेला सण असल्याचे सांगत, त्यामध्ये महिलांचे नृत्य आयोजित करणे योग्य नाही, असे शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी म्हटले आहे. त्याचवेळी डीजे आणि डॉल्बी हिंदू सणांमधून पूर्णपणे हद्दपार करावे असेही त्यांनी म्हटले आहे.

## आंदोलनाने मराठा समाजाला नवीन लाभ मिळणे कठीण : डॉ. बाळासाहेब सराटे

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

आंदोलन गावात करा की मुंबईत करा, तूर्तास तरी आंदोलनाने मराठा समाजाला कोणताही जास्तीचा किंवा नवीन लाभ मिळणार नाही. सरकारने काय दिले आणि आंदोलनाने काय मिळाले याचा विचार करण्यात समाजाची दोन वर्षे गेली. आरक्षण महत्त्वाचे आहेच, पण गरजूंना आरक्षणापर्यंत पोहोचवणे त्याहून जास्त महत्त्वाचे आहे, असे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. बाळासाहेब सराटे यांनी बोलताना म्हटले आहे. डॉ. बाळासाहेब सराटे म्हणाले की, आंदोलकांना आंदोलन सुरू ठेवायचे आहे. पण मराठा आरक्षण आणि आंदोलनाबाबत वास्तव भूमिका घेण्याची नैतिकता सरकारमधील मुख्यमंत्री, मंत्री, प्रशासनिक अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडे नाही. गेल्या तीन वर्षांत हेच सिद्ध झाले आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांनी मनोज जरांगे पाटील यांना सन्मानाने लिखित निमंत्रण देऊन समोरासमोर चर्चेला बोलवावे. ते चर्चेला येत नसतील तर मुंबई उच्च न्यायालयात वस्तुस्थिती मांडावी. योग्य आदेश प्राप्त करून जाहीर चर्चा घडवावी. त्याचे थेट लाईव्ह प्रसारण करावे. या चर्चेत दोन्ही बाजूंनी आरक्षणाचे, आंदोलनाचे, सामाजिक न्यायाचे सर्व संविधानिक पैलू समोरासमोर मांडावेत. म्हणजे समाजाच्या व



राज्याच्या हिताचा काही तरी तोडगा निघेल आणि कोण खरे तेही कळेल. कोणत्याही परिस्थितीत राज्यात शांतता, कायदा व सुव्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची आहे. डॉ. बाळासाहेब सराटे म्हणाले की, 2018 मध्ये दिलेले SEBC आरक्षण गेले त्यात सरकारची चूक आहे. जून 2019 मध्ये मुंबई उच्च न्यायालयात 50% वरील SEBC आरक्षण कसे टिकले? कारण कोर्टासमोर राज्यातील आरक्षणाचे वास्तव मांडले गेले होते. आताही SEBC आरक्षणाची लढाई उच्च न्यायालयात आहे. SEBC टीकणारच नाही, हे अर्धसत्य आहे. ते टिकूही शकते. त्यासाठी सरकार सोबतच मराठा समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

## गणेशोत्सवात पुण्यात १२ दिवस दारुबंदी

### हायकोर्टाने प्रशासनाला फटकारलं, नियमित मद्यपान करणाऱ्यांना आरोग्याच्या समस्या होऊ शकतात



■ पुणे (दै. संध्या)

यंदाच्या गणेशोत्सवात पुणे जिल्हा नेहमीप्रमाणे अधिक चर्चेत आहे. ध्वनीप्रदुषणाच्या मुद्द्यावरुन विद्यानंद बापट यांनी महापालिकेत आपला आवाज उठवला. त्यानंतर, पुणेकरांनी विद्यानंद बापट यांना पाठिंबा दिला असून पुण्यातील गणेशोत्सवात सार्वजनिक ठिकाणी डिजे आणि ध्वनीप्रदुषणास बंदी घालण्यात आली. त्यातच, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी लेझर लाईट आणि डीजेबाबतच्या नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट केले. तसेच, गणेशोत्सव काळात पुण्यात 12 दारुबंदीचाही निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे. मात्र, केवळ पुणे जिल्ह्यातच 12 दिवसांची दारूबंदी का? असा सवाल विचारत मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाला फटाकरले. पुणे जिल्ह्यात गणेशोत्सवातील 12 दिवस दारूबंदी केल्याचा वाद मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला असून केवळ पुणे जिल्ह्यातच दारूबंदी केल्याने मुंबई हायकोर्टाने प्रशासनाला फटकारलं आहे. पुणे जिल्ह्यात दारूविक्रीवर घातलेल्या 12 दिवसांच्या सरसकट बंदीवर कोर्टाने तीव्र नाराजी वर्तवली. प्रत्येक मद्यपान करणारी व्यक्ती कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करेल, असे नाही, अशा शब्दात उच्च न्यायालयाने जिल्हा प्रशासनाला सवाल केला. "ब्लँकेट बॅनमुळे नियमित मद्यपान करणाऱ्यांना आरोग्याच्या गंभीर समस्या होऊन तसेच रुग्णालयांत गर्दी होऊ शकते", असे निरीक्षण मुंबई हायकोर्टाने नोंदवले आहे. कुठल्याही तर्काशिवाय असे ब्लँकेट आदेश देता येणार नाहीत, असे उच्च न्यायालयाकडून स्पष्ट केले. पुण्यात गणेशोत्सवाच्या आगमनाच्या दिवशी, तसेच 25 आणि 26 सप्टेंबर विसर्जनाची मिरवणूक होईपर्यंत दारुबंदी करण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

पुणे जिल्ह्यात ज्या मार्गावरुन मिरवणुका काढल्या जातात. त्या मार्गावरील मद्यविक्री दुकाने संबंधित कालावधीत बंद राहतील. दारुबंदी कायदा 1949 मधील कलम 142 (1) अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश दिले आहेत. मात्र, या निर्णयाविरुद्ध दारुविक्री दुकानदारांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून न्यायालयाने या निर्णयावरुन जिल्हा प्रशासनाला फटकारलं आहे.

### जड वाहनांना प्रवेशबंदी

लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी अवघी पुण्यनगरी सज्ज झाली असून, गणेशोत्सवाच्या काळात शहरात होणारी प्रचंड गर्दी आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता पुणे शहर वाहतूक पोलिसांनी मोठा निर्णय घेतला आहे. गणेशोत्सव काळात नागरिकांची सुरक्षितता जपण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रमुख रस्त्यांवर जड व अवजड वाहनांना 24 तास प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे.

## टीव्हीपुढे बसून बघू नका, अंतरवालीत या

### मुंबईचं वेळापत्रक जाहीर करतो; जरांगे पाटलाचं मराठा बांधवांना आवाहन

■ जालना (दै. संध्या)

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा 14 वा दिवस असून सरकारने त्यांच्या 12 मागण्या मान्य केल्या असल्या तरी वंशावळ आणि कुणबी प्रमाणपत्रासाठी पुरावे दिल्याशिवाय प्रमाणपत्र निघणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे, जरांगे पाटलांच्या मागण्यांची पूर्तता न झाल्याने ते आपल्या उपोषणावर ठाम आहेत. तसेच, मुंबईकडे येणार असल्याचा इशारा त्यांनी यापूर्वीच दिला होता, तर 12 सप्टेंबरपर्यंतची देण्यात आलेली मुदतही संपुष्टात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर जरांगे पाटलांची पुढील भूमिका काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आता, जरांगे पाटलांनी आज पत्रकार परिषद घेऊन मराठा बांधवांना आज अंतरवालीत येण्याचं आवाहन केलं आहे. आज 12 सप्टेंबर रोजी 12 वाजता महाराष्ट्रातल्या गरजवंत मराठा समाजाच्या लेकराबाळासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. शक्यतो प्रत्यक्ष बैठकीला उपस्थित रहावे, कोणीही हायगय करू नका. आता अटीतटीचा सामना आहे, घरी बसून टीव्हीवर बैठक पाहण्याचे दिवस नाहीत, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी राज्यभरातील मराठा बांधवांना अंतरवालीत येण्याचे आवाहन केले आहे. समाजाच्या लेकराची लढाई अंतिम टप्प्यात आलेली आहे, शक्यतो ज्याला ज्याला शक्य आहे त्याने आज बैठकीला हजर रहावे, असे आवाहन जरांगे पाटलांनी केले आहे. ज्यांना येणे



शक्य नाही त्यांनी आशीर्वाद द्यायला रस्त्यावर आले तरी खूप झाले. मात्र, ज्यांना येणे शक्य नाही त्यांनीही आपल्या समाजासाठी लेकरासाठी एक दिवस समाजासाठी द्यावा. जो मार्ग जायचा ठरणार आहे, त्या ठिकाणी हातातली कामं टाकून रस्त्यावर येऊन आशीर्वाद देण्यासाठी या. आज मुंबईचा मार्ग टाकला जाईल, जिथे मुक्कामी असेल तिथल्या बांधवांनी जेवणाची मुक्कामाची व्यवस्था करावी, असे आवाहन जरांगे पाटलांनी केले आहे. मुद्दा पाऊस नाही, अडीअडचणी आहेत, त्यामुळे महिलांनी येऊ नका. गाव सांभाळले तरी खूप झाले, आरक्षणाचे आणि शेतीचे पण संकट आहे. सर्व गावकऱ्यांनी वर्गणी करून गाड्या लावायच्या. एका तालुक्यात आपण लाखा पेक्षा कमी नाहीत, सरकारचे नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाही, असे म्हणत जरांगे पाटलांनी आता मुंबईला जाण्याचा निर्धार केला असून सरकारला थेट इशाराच दिलाय. ज्यादिवशी तारीख ठरेल त्या दिवशी काम सोडून रस्त्यावर या. मुंबईत आम्हाला त्रास झाला तर जागोजाग रस्ते अडवून ठेवा, सणावारचे दिवस आहेत, आपला जाण्याचं त्याच वेळेत ठरणार आहे. मागच्या वेळी परवानगी नाकारली, यावेळी ते नाकारणार नाहीत. परवानगी दिली आणि नाही दिली तरी मुंबईला जाणार असा इशाराच जरांगे पाटलांनी दिला. तसेच, न्याय देवता गोरगरिबांच्या लेकरावर अन्याय करत नाही, असेही त्यांनी म्हटले.

मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. आज मराठा बांधवांची राज्यव्यापी बैठक अंतरवाली सराटीमध्ये बोलावण्यात आली आहे. मात्र मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर याविरोधात हाय कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणावर सुनावणी पार पडली, सुनावणीवेळी हाय कोर्टाकडून महत्त्वाचा आदेश देण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील यांना परवानगीशिवाय मुंबईत आंदोलन करता येणार नाही, असं हाय कोर्टाने म्हटलं आहे. आधी परवानगी घ्या आणि मग मुंबईत येऊन आंदोलन करा असं हाय कोर्टाने या सुनावणीवेळी म्हटलं आहे. तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची तपासणी करण्याच्या सूचना देखील यावेळी हाय कोर्टाकडून करण्यात आल्या आहेत.



## सरकारकडून ओबीसींची फसवणूक

■ मुंबई (दै. संध्या)

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांची राजभवनावर भेट घेतली. या भेटीत राज्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. जातनिहाय जनगणना, ओबीसी समाजाचे प्रश्न, MPSC पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थ्यांचे आंदोलन, शेतकऱ्यांची परिस्थिती आणि दुष्काळसदृश स्थिती या मुद्द्यांकडे पटोलेंनी राज्यपालांचे लक्ष वेधले. या भेटीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत पटोले यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. केंद्रातील मोदी सरकारवर गंभीर आरोप करताना नाना पटोले म्हणाले की, "देशामध्ये ४,२०० पेक्षा जास्त ओबीसी जाती आहेत. सरकारने आणि स्वतः पंतप्रधान मोदींनी देशात जातनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते पाळले जात नाहीये. उलट, ओबीसींची मोठी फसवणूक केली जात आहे. जनगणनेसाठी जे ४० प्रश्न तयार करण्यात आले आहेत, त्यातील १० नंबरच्या प्रश्नातून असे स्पष्ट दिसते की, ओबीसींना थेट 'ओपन' (खुल्या वर्गात) कसे टाकता येईल, याचाच सरकारचा मानस आहे." हा ओबीसींवर मोठा अन्याय असल्याचे ते म्हणाले.

# संपादकीय

## महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत

महाराष्ट्र राज्यात अनेक भागात पावसाचे प्रमाण अत्यंत असमान आहे.जागतिक हवामान संघटनेने तीव्र दुष्काळ, पूर आणि उष्णतेच्या लाटा येण्याचा इशारा दिलेला आहे. त्याशिवाय एल निनोचा जगासह आपल्या भारतात सुध्दा अधिक परिणाम जाणवताना दिसत आहे. त्याचे परिणामाचे स्वरूप अक्राळविक्राळ होत चाललेले आहे. संपूर्ण ऑगस्ट महिन्यात पाऊसाने दडी मारलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंताजनक वातावरण आहे. यंदाच्या मान्सूनने शेतकऱ्यांची कठोर परीक्षा घेतलेली आहे. पाऊस न झाल्याने याचा प्रचंड फटका खरीप पिकांच्या हंगामाला बसलेला आहे. राज्यातील विविध भागात दुष्काळ जोर धरू लागलेला आहे. हवामानाच्या तापमानात सातत्याने वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे महाराष्ट्र अभूतपूर्व दुष्काळाच्या संकटात सापडलेला आहे. मात्र सरकारी यंत्रणा अजून पावसाच्या सरासरी आकडेमोडीतच अडकून पडलेली दिसत आहे. दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन केद्रसरकार व राज्यसरकारने तातडीने सकारात्मक पाऊले उचलण्याची आवश्यकता असताना सरकारी यंत्रणा मात्र सत्तेच्या अहंकारात मश्गुल आहे. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहात बसला आहे.विद्यार्थी न्याय आणि परीक्षेतील पारदर्शकतेसाठी रस्त्यावर उतरलेली दिसत आहे. आदीवासी आपल्या मूलभूत हक्कासाठी संघर्ष करत आहेत.मराठा आणि धनगर समाज आरक्षणाच्या प्रलंबित प्रश्नासाठी आंदोलन करत आहेत. तर बेरोजगारी. महागाई. आणि कर्जबाजारीपणाने सामान्य माणसाचे जगणे मुश्किल झाले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक घटक आज प्रश्न विचारत रस्त्यावर उतरला आहे. व उतरत आहे. हे सरकार प्रश्नाची उत्तरे देत नाही. प्रश्न सोडविण्याऐवजी समित्या. बैठका. स्थगित्या. आणि भरमसाठ आश्वासनाचा खेळ सुरु आहे. जनतेचा आवाज ऐकण्याऐवजी आंदोलन दडपण्याचा मार्ग स्विकारला जात आहे.व आदोलनात फूट पाडली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील संकटे केवळ नैसर्गिक.आर्थिक. अथवा सामाजिक राहीलेली नाहीत. ती सरकारच्या निष्क्रियतेने आणि संवेदनाहीन कारभाराने अधिकच गंभीर होत आहेत. भर पावसाळ्यात महाराष्ट्र दुष्काळात होरपळत आहे. मराठवाडा. विदर्भ. खानदेश. पश्चिम महाराष्ट्रातील बहुतेक तालुक्यामध्ये गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारलेली आहे. नदी नाले कोरडे पडलेले आहेत. बाजरी. बटाटा. सोयाबीन व कडधान्य ही खरीप पिके करपण्याच्या स्थितीत उभी आहेत. फळबागा धोक्यात आलेल्या आहेत. जनावरासाठी चारा व माणसासाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेदिवस गंभीर बनत चाललेला आहे. येथून पुढे रब्बी हंगामाची शाश्वती राहीलेली नाही. शेतकऱ्यांने बियाणे. खते. किटकनाशके. व मजूरी यावर केलेला वारेमाप पुंजी वसूल होणार की नाही याची चिंता त्याला सतावत आहे.कर्जमाफीच्या घोषणाचा गाजावाजा झाला. पण प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला. हा स्वतंत्रपणे तपासण्याचा विषय आहे. एकीकडे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या घोषणा आणि दुसरीकडे त्याच्या उत्पादन खचाची भरपाई न होण्याची परिस्थिती ही विसंगती सरकारच्या कृषी धोरणाचे अपयश अधोरेखीत करते. दुष्काळाच्या या संकटाला फक्त निसर्गाचा कोप म्हणून झटकून टाकता येणार नाही.




## डॉ. सुधाकर चव्हाण यांना 'विश्वारंभ कला' पुरस्कार प्रदान

**पुणे : दैनिक संध्या**

कुठलीही संस्था किंवा विद्यापीठ हे तेथील इमारतींमुळे नव्हे, तर शिक्षकांमुळे आणि त्यांनी घडविलेल्या विद्यार्थ्यांमुळे नावलौकिक मिळवत असते. कुठल्याही विषयाची संकल्पना समजावून, अनुभवून देण्याचे कौशल्य हे केवळ शिक्षकांमध्ये असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एआयला नव्हे, तर शिक्षकांना प्रश्न विचारायला हवेत, असे प्रतिपादन प्रसिद्ध भित्तिचित्रकार तथा मुंबईतील प्रतिष्ठित 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाईन' या अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हिमकुमार चॅटर्जी यांनी केले. ते एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे, तर्फे आयोजित 'विश्वारंभ कला पुरस्कार' सोहळ्याप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी हजारो कलाशिक्षकांना घडविणारा शिल्पकार अशी ओळख असणारे वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा प्रख्यात दृश्यकलाकार डॉ. सुधाकर चव्हाण यांना दृश्यकलेतील अनन्यसाधारण योगदानाबद्दल प्रतिष्ठित 'विश्वारंभ कला पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे चिरंजीव श्री. अमित चव्हाण यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक सौ.ज्योती कराड-ढाकणे, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. नचिकेत ठाकूर, एमआयटी स्कूल ऑफ फाइन आर्ट्सचे अधिष्ठाता डॉ. गणेश तरतरे आदी उपस्थित होते. चॅटर्जी पुढे म्हणाले, "कलाकृती ही कलाकारापेक्षा अधिक आयुष्य घेऊन जन्माला येते. त्यामुळे कलाकाराने केवळ व्यवहारावर भर न देता योगदानावर भर द्यावा व अखेरीस शांती व तृप्तीच्या रसाचा आनंद घ्यावा. कारण कला ही मनुष्याच्या अंतापर्यंत साथ देते आणि ज्याला कलेची आवड आहे, त्यालाच मनुष्य म्हटले जाऊ शकते." याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'एक्यू' मासिकाचे प्रकाशन तसेच 'कलाकोश'च्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच, एमआयटी स्कूल ऑफ फाइन आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. विश्वशांती प्रार्थनेने सुरू झालेल्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. प्रा. शिरिन चिमथानवाल व प्रा. टेरेसा जोशी यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. विराज कांबळे यांनी आभार मानले.

'विश्वारंभ' या नावातच काहीतरी नावीन्यपूर्ण तयार करण्याची संकल्पना आहे. या नावामागे मार्गदर्शक प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांची प्रेरणा आहे. प्रा. डॉ. कराड हेही एक सुंदर कलाकार आहेत. जगातील सर्वांत मोठा विश्वशांती घुमट आणि विश्वराजबागेची बांधणी या त्यांच्याच दृष्टीतून साकारलेल्या अप्रतिम कलाकृती आहेत. त्यामुळे डॉ. सुधाकर चव्हाण यांना 'विश्वारंभ कला पुरस्कार' प्रदान करताना अत्यानंद होत आहे."

— सौ. ज्योती ढाकणे-कराड
कार्यकारी संचालक, एमआयटी एडीटी, विद्यापीठ, पुणे

# संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळ्यात 'समाज भूषण पुरस्कार' प्रदान

■ पुणे (दै. संध्या)

श्री संतसेना महाराज नाभिक एकता संघ, पुणे शहर यांच्या वतीने संतसेना महाराज पुण्यतिथी सोहळा पद्मावती येथील विणकर सभागृहात झाला. यावेळी शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल माध्यमिक शिक्षक विलास बाबुराव बोरसे आणि सामाजिक-राजकीय क्षेत्रातील कार्याबद्दल रा.ज.से. पक्षाचे जिल्हाध्यक्ष भगवान रघुनाथ शिंदे यांना 'समाज भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मनोज अहिरराव, उपाध्यक्ष पंडित निंबा निकम, उपाध्यक्ष योगेश फुलपगार आणि खजिनदार समाधान निकम कैलास नेर पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात नगरसेवक बाळा धनकवडे, सहयोग फाउंडेशनच्या अध्यक्षा बेबीताई कडेकर, नाभिक एकता संघ पुणे चे पदाधिकारी भिकन वाघ, रामदास सैंदाणे आणि नाभिक समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत सेना महाराज पालखी सोहळ्याने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन, मान्यवरांचे स्वागत आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. ह.भ.प. अर्चना रमेश शेंडगे यांचे संत सेना महाराजांच्या जीवनकार्यावर प्रवचन झाले. त्यांनी संत सेना महाराजांनी मांडलेले भक्ती, कर्म, सेवा, समता आणि माणुसकीचे विचार उपस्थितांना सांगितले.भगवान रघुनाथ शिंदे म्हणाले, संत सेना महाराज हे संत नामदेव महाराजांच्या समकालीन होते. संतांनी आपली जात लपविली नाही. ते जातीच्या पलीकडे होते. भक्ती आणि शक्तीचा संगम आपल्या समाजात आहे. संत सेना महाराजांच्या विचारांचे स्मरण करून ते आचरणात आणणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले. दहावी बारावी चे गुणवंत विद्यार्थी अक्षरा अहिरराव तसेच वीस मुला मुलींचे ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील पगारे यांनी केले. डॉ. अरविंद झेंडे यांनी आभार मानले.



# मलेशियाच्या भूमीवर भारतीय बालगणितपटूंचा डंका; 'किड्स ब्रेन अकॅडमी'च्या चार विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

■ पुणे (दै. संध्या)

मलेशियातील पुतराजया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय '२०२६ ऑनर कप अबॅकस मेंटल मॅथ्स अँड मॅथेमॅटिक्स चॅम्पियनशिप' मध्ये पुण्यातील किड्स ब्रेन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले. ३० ऑगस्ट २०२६ रोजी पुतराजया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर (PICC) येथे झालेल्या या स्पर्धेत मंजिरी थिटे, आरोही हुवाणी, आरणा पवार आणि वेदांत सक्सेना यांनी विविध गटांत अव्वल क्रमांक पटकावत आपली गणितीय बुद्धिमत्ता सिद्ध केली.

स्पर्धेतील मेंटल मॅथ्स विभागात विद्यार्थ्यांसमोर वेग आणि अचूकतेची कसोटी पाहणारे आव्हान होते. अवघ्या पाच मिनिटांत १२० गणिते सोडविण्याची परीक्षा घेण्यात आली. या अतिशय वेगवान गणिती चाचणीत अचूक गणना, एकाग्रता, स्मरणशक्ती आणि वेळेचे व्यवस्थापन या सर्वांचा कस लागला. या आव्हानात किड्स ब्रेन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी कामगिरी केली.

मंजिरी थिटे हिने J15 गटात प्रथम क्रमांक पटकावला. त्याचबरोबर मॅथ्स ऑलिम्पियाडमध्ये तिने पाचवा क्रमांक मिळवला. आरोही हुवाणी हिने F10 गटात प्रथम क्रमांक, तर मॅथ्स ऑलिम्पियाडमध्ये पाचवा क्रमांक मिळवला. आरणा पवार हिने J15 गटात द्वितीय क्रमांक पटकावला असून मॅथ्स ऑलिम्पियाडमध्ये पाचवा क्रमांक मिळवला. तिच्या या कामगिरीची प्रमाणपत्राद्वारेही नोंद करण्यात आली आहे. प्रमाणपत्रानुसार तिला Mental Maths Group मध्ये दुसरा आणि Mathematics Group मध्ये पाचवा क्रमांक मिळाला. वेदांत सक्सेना यानेही J15 गटात तृतीय क्रमांक पटकावला आणि मॅथ्स ऑलिम्पियाडमध्ये पाचवा क्रमांक मिळवला. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देशांतील स्पर्धकांसोबत आपल्या गणितीय कौशल्याची चाचणी घेण्याची संधी मिळाली. अबॅकस आणि मेंटल मॅथ्सच्या माध्यमातून वेगवान गणना करण्याबरोबरच तार्किक विचार, एकाग्रता आणि अचूकता विकसित करण्यावर अशा स्पर्धांचा भर असतो. यापूर्वीही 'Honour Cup Abacus Mentalmaths and Mathematics Championship'चे आयोजन पुतराजया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर येथे झाले असून, या स्पर्धेत पाच मिनिटांची गणित सोडविण्याची फेरी आणि स्वतंत्र गणित स्पर्धा असे विभाग असल्याची नोंद उपलब्ध आहे. किड्स ब्रेन अकॅडमीच्या संस्थापक सौ. पल्लवी थिटे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही कामगिरी केली. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतीय विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे त्यांच्या पालकांसह किड्स ब्रेन अकॅडमीमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या यशाबद्दल मंजिरी थिटे, आरोही हुवाणी, आरणा पवार आणि वेदांत सक्सेना तसेच त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शिका सौ. पल्लवी थिटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# श्रीमंत 'दगडूशेठ' हलवाई गणपती ट्रस्टच्या 'प्रेम मंदिर' सजावटीचे सोमवारी उद्घाटन



■ पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षी गणेशोत्सवात वृंदावन मधील प्रेम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. गणेश चतुर्थीला सोमवार, दिनांक १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी उत्तरप्रदेश वृंदावन येथील श्री राधावल्लभ मंदिराचे १८ वे तिलकायत अधिकारी श्रीहित मोहितमराल गोस्वामीजी महाराज यांच्या हस्ते श्रीं ची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. तर, मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उद्घाटन सायंकाळी ७ वाजता राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होईल, अशी माहिती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी आणि सरचिटणीस व आमदार हेमंत रासने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सोमवारी (दि.१४) प्राणप्रतिष्ठापनेपूर्वी सकाळी ८.३० वाजता मुख्य मंदिरापासून फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून श्रीं ची आगमन मिरवणूक काढण्यात येणार आहे. विविध प्रकारच्या आकर्षक फुलांनी रथ सजविण्यात येणार आहे. प्रतिष्ठापनेनंतर उत्सवमंडपात दुपारी १२ पासून भाविकांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घ्यावा. राधा-कृष्णांप्रती असलेले दिव्य प्रेम, भक्तीचा वास असलेल्या प्रेम मंदिराची तेजस्वी प्रतिकृती यंदाच्या गणेशोत्सवात साकारण्यात आली असून भाविकांकरिता प्रेमभावनेत तल्लीन करणारा आध्यात्मिक प्रवास यानिमित्ताने घडविण्यात येणार आहे. नानाविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या मंदिराची प्रतिकृती सुमारे १०० फूट इतकी असेल. जिथे भक्ती प्रेम बनते आणि प्रेम देवत्व बनते या संकल्पनेवर आधारित ही भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. प्रतिकृतीच्या रचनेत संगमरवरी वास्तुकलेपासून प्रेरित भव्य दर्शन भाग असणार आहे. उत्तर भारतीय मंदिराच्या पारंपरिक रचनेचे प्रतिबिंब दर्शवणारी कलाकुसर केलेले स्तंभ आणि घुमट, रासलीला, गोवर्धन लीला, झुला यांसारख्या कृष्णलीला दर्शविणारे शिल्पपट देखील असणार आहेत. शोभिवंत फुलांची सजावट, पवित्र शुभचिन्हे आणि आकर्षक विद्युतरोषणाईमुळे सायंकाळनंतर हे मंदिर उजळून निघणार आहे. प्रारंभी बुधवार चौकामध्ये भव्य कमान साकारण्यात येणार असून त्यावर आकर्षक नक्षीकाम पहायला मिळेल. मुख्य प्रतिकृतीच्या दोन्ही बाजूंना असलेल्या रनिंग मांडवावर कृष्णलीलेतील विविध प्रसंग साकारण्यात आले आहेत. मंदिराच्या वर दर्शनी भागात राधा-कृष्णाची भव्य मूर्ती देखील आहे. प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच असणार आहे. यामध्ये अनेक भव्य खांब असून विविध मूर्ती देखील असणार आहेत. गाभारा व मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रींचे दर्शन घेता येईल.

# सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिरात झुला उत्सव साजरा

■ पुणे (दै. संध्या)

श्रावणातील प्रसन्न वातावरण, फुलांचा सुगंध, रंगीबेरंगी रांगोळ्या आणि निसर्गाशी नाते सांगणाऱ्या सजावटीने सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिराचा परिसर भक्तिमय झाला होता. फुले, विविध प्रकारच्या भाज्या, फळे तसेच इतर पर्यावरणपूरक साहित्याचा कल्पक वापर करून मंदिरात करण्यात आलेली आकर्षक सजावट आणि झुल्यावर विराजमान श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती आणि श्री महाकाली देवींच्या मूर्तींचे मनोहारी रूप भाविकांचे लक्ष वेधून घेत होते.

ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल तसेच प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव पार पडला. श्रावण महिन्यात देवदेवतांना झुल्यावर विराजमान करून पूजा-अर्चा करण्याची परंपरा आहे. पावसाळ्यात निसर्ग बहरलेला असताना फुले, पाने आणि नैसर्गिक घटकांच्या माध्यमातून देवतांची सजावट करण्याची प्रथा विविध ठिकाणी पाहायला मिळते. या परंपरेला पर्यावरणपूरकतेची जोड देत यंदाच्या झुला उत्सवात सजावटीसाठी फुले, भाज्या, फळे आणि अन्य पर्यावरणपूरक सामग्रीचा वापर करण्यात आला. मंदिर परिसरात साकारलेल्या विविधरंगी रांगोळ्या, फुलांची आरास आणि झुल्याची आकर्षक सजावट यामुळे उत्सवाचे सौंदर्य अधिक खुलले. दररोज सायंकाळी ७.१५ वाजता दर्शनाची व्यवस्था होती, तर सायंकाळी ७.४५ वाजता झुला विशेष महाआरती करण्यात आली. उत्सवादरम्यान भाविकांनी सहकुटुंब दर्शन घेत आरतीचा लाभ घेतला.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सनईच्या मंगलध्वनीने जिंकली पुणेकर रसिकांची मने!

पुणे : दैनिक संध्या

भारत सरकारच्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स) चे पुणे विभागीय कार्यालय व लोकमान्य कल्चरल फाउंडेशन विद्यमाने भांडारकर इन्स्टिट्यूटच्या नवलमल फिरोदिया सभागृहात 'मंगलध्वनी - सनईवादन'या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शतकांचा वारसा असलेल्या विशेषतः विविध सण उत्सव व विवाह सोहळ्यांमध्ये आवर्जून वादन होत असलेल्या 'सनईवादन' या संगीतकलेचे सादरीकरण यावेळी डॉ.पंडित प्रमोद गायकवाड व नम्रता गायकवाड यांनी केले. वाचस्पती, बनारसी कजरी व रागेश्री अशा रांगांमध्ये तसेच सनईवादनातून नाट्यपदाच्या सादरीकरणाने पुणेकर रसिकांची मने जिंकली. या कार्यक्रमाला संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध सनईवादक पंडित शैलेश भागवत यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. तसेच केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तथा पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते यावेळी पंडित शैलेश भागवत यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे,लोकमान्य सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकूर, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स) चे पुणे विभागीय कार्यालयाचे उपविभागीय अधिकारी सुदर्शन शेट्टी, लोकमान्य कल्चरल फाउंडेशनच्या उपाध्यक्ष अद्वैता उमराणीकर व लोककल्प फाउंडेशनच्या अध्यक्ष मंजिरी नाईक यांच्यासह विविध मान्यवर व परदेशी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सनईवादनाच्या या कार्यक्रमात सीमा गायकवाड, प्रेरणा गायकवाड, कुमारी ध्वनी गायकवाड, तबलावद्क किशोर कोरडे व चौघडावादक केदार जाधव यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. तर योगेश रांगणेकर यांनी सूत्रसंचालन केले.या कार्य्रक्रमासाठी आभा औटी आदींनी विशेष सहकार्य केले.

### महारेराचा 'अॅक्वारा बिल्डर्स'ला दणका

पुणे : दैनिक संध्या

वडगाव बुद्रुक येथील 'अॅक्वारा प्राइड' या गृहप्रकल्पातील सदनिकांचा ताबा देण्यास झालेल्या विलंबाप्रकरणी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) अॅक्वारा बिल्डर्स अँड डेव्हलपर्सला चार सदनिकाधारकांना विलंबाचे व्याज देण्याचे आदेश दिले आहेत. महारेरा सदस्य महेश पाठक यांनी नुकताच हा आदेश दिला. 'अॅक्वारा प्राइड' प्रकल्पाची महारेरा नोंदणी क्रमांक पी-५२१००३१८६३ असून, सी विंगमधील ४०६, ५०५, ५०९ आणि ५११ क्रमांकाच्या सदनिकांशी संबंधित चार तक्रारी महारेराकडे दाखल झाल्या होत्या. संबंधित करारांनुसार सदनिकांचा ताबा ६ सप्टेंबर २०२५ रोजी देणे अपेक्षित होते. मात्र, मुदत उलटूनही ताबा मिळाला नसल्याने सदनिकाधारकांनी ताब्यासह व्याज, भरपाई आणि खर्चाची मागणी केली होती. प्रकल्पाला विलंब होण्यामागे नैसर्गिक वायू व बांधकाम साहित्याची टंचाई, पुरवठा साखळीतील अडथळे, मनुष्यबळाची कमतरता तसेच युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम झाल्याचा दावा विकासकाने केला. त्यामुळे प्रकल्पाची मुदत ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याचेही विकासकाने सांगितले होते. दरम्यान, महारेराच्या आदेश क्रमांक ६६/२०२६नुसार संबंधित प्रकल्पाला चार महिन्यांची मुदतवाढ लागू असल्याचे प्राधिकरणाने नमूद केले. त्यामुळे ६ सप्टेंबर २०२५ ही ताब्याची मुदत चार महिन्यांनी वाढवून ६ जानेवारी २०२६ करण्यात आली. मात्र, या वाढीव मुदतीतही ताबा न दिल्याने ७ जानेवारी २०२६पासून प्रत्यक्ष ताबा आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) देईपर्यंत व्याज देण्याचे आदेश महारेराने दिले. हे व्याज प्रत्यक्ष भरलेल्या सदनिकेच्या रकमेवर'एसबीआय'च्या'एमसीएलआर'पेक्षा दोन टक्के अधिक दराने देण्याचे निर्देश आहेत. स्वतंत्र भरपाईची मागणी मात्र महारेराने फेटाळली आहे. तसेच पूर्ण ओसी मिळाल्यानंतर व्याजाची रक्कम देण्याची मुभा विकासकाला देण्यात आली असून, ती रक्कम सदनिकाधारकांच्या थकीत देयकांमध्ये समायोजित करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

### भव्य हरिहर मंदिरात विराजमान होणार अखिल मंडई मंडळाचे शारदा गजानन

पुणे : दैनिक संध्या

भगवान विष्णू आणि भगवान शिव यांच्या एकात्म स्वरूपाचे प्रतीक असलेल्या 'हरिहर' संकल्पनेवर आधारित भव्य मंदिराची उभारणी अखिल मंडई मंडळाकडून यंदाच्या गणेशोत्सवासाठी करण्यात येत आहे. शेषशायी विष्णूची मूर्ती, शिवपिंड तसेच शिव-विष्णूच्या समन्वयाचे दर्शन घडविणाऱ्या या काल्पनिक मंदिराच्या माध्यमातून भक्तांना ऐक्य, समरसता आणि परस्पर सन्मानाचा संदेश देण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी दिली. अखिल मंडई मंडळाच्या उत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष आहे. हरिहर मंदिराची ही संकल्पना भगवान विष्णू अर्थात 'हरि' आणि भगवान शिव अर्थात 'हर' यांच्या एकात्म स्वरूपावर आधारित आहे. पालनकर्ता विष्णू आणि परिवर्तनाचे अधिष्ठाता भगवान शिव यांचे हे एकत्रित रूप विविधतेत एकतेचा संदेश देणारे आहे. तब्बल ९० बाय ६० फूट आकाराच्या मंडपात २५ फूट उंचीचे हे मंदिर पूर्णपणे फायबरमध्ये साकारण्यात आले असून, देखाव्याची भव्यता भाविकांचे लक्ष वेधून घेणार आहे. या मंदिरामध्ये शेषशायी विष्णूची मूर्ती, शिवपिंड यांसह हिंदू धर्मातील विविध पवित्र प्रतीकांचा समावेश करण्यात आला आहे. पारंपरिक मंदिराची रचना, धार्मिक प्रतीके आणि सजावटीच्या माध्यमातून शैव आणि वैष्णव परंपरांचा सुंदर समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या भव्य मंदिराची कलात्मक संकल्पना आणि निर्मिती कलादिग्दर्शक विशाल ताजनेकर आणि गजेंद्र पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. संपूर्ण मंदिर फायबरमध्ये साकारण्यात आले असून, २५ फूट उंचीमुळे त्याची भव्यता अधिक उठून दिसणार आहे. अण्णा थोरात म्हणाले, हरिहर मंदिराची संकल्पना ही भगवान शिव आणि भगवान विष्णू यांच्या एकात्मतेचा संदेश देणारी आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तांमध्ये ऐक्य भावना निर्माण व्हावी, हा या देखाव्यामागील उद्देश आहे.

### 'औद्योगिक क्लिनिक'ची शनिवारी कार्यशाळा

पुणे : दैनिक संध्या

पुणे: लघु व मध्यम उद्योग, व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'औद्योगिक क्लिनिक' या संकल्पनेची सुरुवात करण्यात आली आहे. ही संकल्पना पूर्णपणे नवीन असून, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडचे माजी व्यवस्थापकीय संचालक यशवंत घारपुरे यांचा हा महत्त्वाकांक्षी आणि स्वप्नवत प्रकल्प आहे. 'औद्योगिक क्लिनिक'च्या पहिल्या सत्राचे आयोजन येत्या शनिवारी (ता. १२) सकाळी हॉटेल रविराज येथे करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विनामूल्य आहे. मात्र, नियोजनासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून, सहभागासाठी ९८२००२६२६५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. यशवंत घारपुरे म्हणाले, " लघु व मध्यम उद्योगांना येणाऱ्या समस्यांचे निवारण करण्यासाठी पुरेशी माहिती किंवा मार्गदर्शन उपलब्ध नसते. याच पार्श्वभूमीवर 'इंडस्ट्रियल क्लिनिक'ही संकल्पना समोर आली असून त्यावर प्रत्यक्ष काम करणार आहे.



## खरेदीसाठी बाजारात गर्दी

बाप्पाच्या पाठोपाठ गौराईचे आगमन होत आहे. अत्यंत शुभ, आनंदायी लक्ष्मीच्या रूपाने आपल्या घरी गौरींच्या आगमनाची प्रत्येक महिलेला उत्सुकता आहे. आकर्षक मुखवटे बाजारात उपलब्ध झाले आहे, त्याच बरोबर गौरी बरोबर अनेक देखाव्यासाठी मातीने तयार केलेले अनेक पुतळे जसे तुतारी सोबत मावळे, तुलसी वृंदावन, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज, वारकरी संप्रदाय आपल्या घरात देखाव्यासाठी महिलांची खरेदी वरून पसंती दिसून येत आहे.

( Exclusive Pictures by Sushil Rathod )





## स्कॉर्ट्स कुबोटाकडून फार्मट्रॅकच्या तीन दशकांच्या प्रवासाचे सेलिब्रेशन

■ पुणे (दै. संध्या)

कृषी यंत्रसामग्री आणि बांधकाम उपकरण क्षेत्रातील आघाडीची कंपनी एस्कॉर्ट्स कुबोटा यांनी भारतातील आपल्या फार्मट्रॅक ब्रँडच्या तीन दशकांच्या यशस्वी प्रवासानिमित्त दोन नवीन उत्पादने सादर केली आहेत. ६०५५ क्लासिक 'डार्क एडिशन' हा फार्मट्रॅक गुंतवणुकीमधील पहिला संपूर्ण काळ्या रंगातील ट्रॅक्टर असून तो ५५ एचपी श्रेणीत टू-व्हील ड्राईव्ह (२डब्ल्यूडी) आणि फोर-व्हील ड्राईव्ह (४डब्ल्यूडी) या दोन्ही प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. याचबरोबर, "प्रोमॅक्स २.०" अंतर्गत प्रोमॅक्स मालिकेचा विस्तार करत ४७ एचटी प्रोमॅक्स (४७ एचपी) आणि ५० प्रोमॅक्स (५० एचपी श्रेणी) ही दोन नवीन मॉडेल्स अनावरण करण्यात आली असून तीदेखील टू-व्हील ड्राईव्ह (२डब्ल्यूडी) आणि फोर-व्हील ड्राईव्ह (४डब्ल्यूडी) पर्यायांमध्ये उपलब्ध आहेत.

कंपनी भारतात कुबोटा, फार्मट्रॅक आणि पॉवरट्रॅक हे तीन ट्रॅक्टर ब्रँड्स संचलित करते. हे ब्रँड अनुक्रमे प्रीमियम, एंट्री-प्रीमियम आणि व्हॅल्यू सेगमेंट्सना सेवा देतात. १९९५ मध्ये सुरू करण्यात आलेला फार्मट्रॅक ब्रँड आज भारतात २६ एचपी ते ६० या श्रेणीत विविध मॉडेल्स उपलब्ध करून देतो.

फार्मट्रॅक ६०५५ क्लासिक 'डार्क एडिशन' मध्ये शक्तिशाली चार-सिलिंडर, ३६८२ सीसी इंजिन देण्यात आले आहे, जे कमाल २४७ एनएम टॉर्क प्रदान करते. त्यामुळे कठीण आणि आव्हानात्मक शेतीकामांमध्ये उत्कृष्ट कामगिरी सुनिश्चित होते. या ट्रॅक्टरमध्ये २,५०० किलो क्षमतेची हेव्ही-ड्युटी हायड्रॉलिक लिफ्ट, प्रीमियम एलईडी लाईटिंग आणि हीट शिल्डसारखी वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. उच्च उत्पादकता आणि टिकाऊपणाची अपेक्षा असलेल्या प्रगत शेतकरी व मोठ्या भूधारकांसाठी हा ट्रॅक्टर विशेषतः विकसित करण्यात आला आहे. सुपर सीडर, लेझर लेव्हलर, रिव्हर्सिबल एमबी प्लाऊ, रोटाव्हेटर, हॅरो तसेच जड वाहतूक यांसारख्या प्रगत कृषी अवजारांसोबत तो प्रभावीपणे कार्य करू शकतो. प्रोमॅक्स २.० श्रेणीतील ४७ एचटी प्रोमॅक्स आणि ५० प्रोमॅक्स मॉडेल्समध्ये फार्मट्रॅकचे अत्याधुनिक ३५१४ सीसी हाय टॉर्क इंजिन देण्यात आले असून ते २३० एनएम पर्यंत टॉर्क निर्माण करते. दोन्ही मॉडेल्समध्ये १२ फॉरवर्ड आणि ३ रिव्हर्स गिअरबॉक्स, क्रीपर स्पीडचा पर्याय आणि चालकाच्या आरामदायी अनुभवासाठी



प्रशस्त फ्लॅट प्लॅटफॉर्म देण्यात आला आहे. आधुनिक शेतीच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेली ही मालिका उच्च टॉर्क, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि फोर-व्हील ड्राईव्ह पर्यायांसह जड आणि आव्हानात्मक कामांसाठी सक्षम आहे.या लॉन्चबाबत मत व्यक्त करताना निखिल नंदा, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, म्हणाले, "६०५५ क्लासिक 'डार्क एडिशन' आणि प्रोमॅक्स २.० ही उत्पादने आमच्या गुंतवणुकीमधील अधिक सक्षम आणि अनुप्रयोग-केंद्रित बनविण्याच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहेत. फार्मट्रॅकने भारतात तीन दशकांचा टप्पा पूर्ण केला असून, हा ब्रँड विविध हॉर्सपॉवर श्रेणींमध्ये आमची मजबूत उपस्थिती टिकवून ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या प्रत्येक नव्या उत्पादनाद्वारे आम्ही भारतीय बाजारपेठेत अधिक मजबूत स्थान मिळविण्याच्या आमच्या ध्येयाकडे वाटचाल करत आहोत."अकिरा काटो, डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर, म्हणाले, "४१ ते ५० एचपी ही श्रेणी देशांतर्गत बाजारपेठेतील सर्वात मोठा विभाग आहे. मात्र या विभागातील ग्राहकांची मागणी वेगाने बदलत असून, शेतकरी अधिक आव्हानात्मक कामे करत असल्यामुळे फोर-व्हील ड्राईव्ह (४डब्ल्यूडी) आणि उच्च टॉर्क ट्रॅक्टर्सना अधिक पसंती देत आहेत. ४७ एचटी प्रोमॅक्स आणि ५० प्रोमॅक्स ही मॉडेल्स आधीपासूनच मजबूत बाजारपेठीय उपस्थिती निर्माण केलेल्या मालिकेचा नैसर्गिक विस्तार आहेत. तर 'डार्क एडिशन' प्रीमियम ५५ एचपी श्रेणीत आकर्षक स्टाइलिंग आणि दोन्ही ड्राइव्ह पर्यायांसह नवीन निवड उपलब्ध करून देते." नीरज मेहरा, चीफ ऑफिसर, ट्रॅक्टर बिझनेस डिव्हिजन, म्हणाले, "गेल्या पाच ते आठ वर्षांत जड यांत्रिकीकरणाचा वाढता वापर आणि शेतीमध्ये निर्णय घेणाऱ्या नवीन तरुण पिढीच्या सहभागामुळे ग्राहकांच्या अपेक्षांमध्ये मोठा बदल झाला आहे. शेतकरी आता केवळ मूलभूत ट्रॅक्टर्सऐवजी अधिक आरामदायी, आधुनिक डिझाइन आणि बहुउपयोगी क्षमता असलेल्या यंत्रांकडे वळत आहेत.

प्रोमॅक्स २.० त्याच्या हाय टॉर्क इंजिन, क्रीपर स्पीड पर्याय आणि प्रशस्त फ्लॅट प्लॅटफॉर्मद्वारे या अपेक्षा पूर्ण करते. तर फार्मट्रॅकचा पहिला काळ्या रंगातील ट्रॅक्टर असलेला ६०५५ क्लासिक 'डार्क एडिशन' आकर्षक डिझाइन आणि दमदार कामगिरी यांचा उत्कृष्ट संगम सादर करतो. या दोन्ही उत्पादनांमुळे फार्मट्रॅक ब्रँड अधिक मजबूत होईल आणि प्रगत व तंत्रज्ञानाभिमुख शेतकरी समुदायामध्ये आमची उपस्थिती लक्षणीयरीत्या वाढेल, असा आम्हाला विश्वास आहे." ही दोन्ही नवीन उत्पादने फार्मट्रॅकच्या अधिकृत डीलर नेटवर्कमार्फत देशभरात उपलब्ध करण्यात येत आहेत.

## लोककला-साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश आवश्यक

■ पुणे (दै. संध्या)

जगातील सर्वांत यशस्वी विद्यार्थी म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण देता येईल. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत लोककला व साहित्याची महत्त्वपूर्ण भूमिका होती. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्वही त्यांच्याप्रमाणे घडवायचे असेल, तर लोककला आणि साहित्याचा शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश कसा करता येईल, याबाबत चिंतन होणे आवश्यक आहे. आजच्या काळात विद्यार्थ्यांचे मनोबल बळकट करण्याचीही गरज असून, लोककला व साहित्याचा शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश केल्यास विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर बनविता येईल, असे मत शिक्षण प्रसारक




मंडळी, पुणे नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर यांनी व्यक्त केले.

शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, सेवा मित्र मंडळ आणि ठाकूर परिवाराच्या वतीने ज्येष्ठ शिक्षक व शाहीर कै. शशिकांत ठाकूर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी 'लोकशिक्षक पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदाचा १९वा 'लोकशिक्षक पुरस्कार' त्र्यंबकेश्वर प्रतिष्ठान, कसबे पुणे येथील मर्दानी आखाड्याचे वस्ताद विनोददादा आढाव यांना त्यांच्या राहत्या घरी प्रदान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, प्रबोधिनीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे , महाराष्ट्र अरुणकुमार बाभुळगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## कुचिपुडीच्या लयीत शनिवारी रंगणार 'रंगप्रवेशम्'

■ पुणे (दै. संध्या)

समर्चना स्कूल ऑफ डान्सच्या वतीने युवा नृत्यांगना सयुजा मुजुमदार हिचा कुचिपुडी 'रंगप्रवेशम्' सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या विशेष सोहळ्यात सयुजा आपल्या अनेक वर्षांच्या नृत्यसाधनेचे सादरीकरण करणार आहे.

या सोहळ्याला कुचिपुडी परंपरेतील मान्यवर कलाकारांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त नृत्य चूडामणी वैजयंती काशी प्रमुख अतिथी म्हणून, तर नृत्य निपुणा प्रतीक्षा काशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. वयाच्या पाचव्या वर्षापासून नृत्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या सयुजाने भरतनाट्यम आणि कुचिपुडी या शास्त्रीय नृत्यप्रकारांसह योगासने, बॅले आणि समकालीन नृत्याचाही अभ्यास केला आहे. कुचिपुडीचे प्राथमिक प्रशिक्षण तिने गुरू नमिता मुजुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. त्यानंतर प्रख्यात कुचिपुडी नृत्यांगना नृत्य चूडामणी श्रीमती वैजयंती काशी यांच्या मार्गदर्शनामुळे तिच्या कलाप्रवासाला अधिक समृद्ध दिशा मिळाली. कुचिपुडी नृत्यांगनेसाठी 'रंगप्रवेशम्' हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

## राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांना 'संसदरत्न' पुरस्कार

■ पुणे (दै. संध्या)

संसदेतील सर्वोत्तम कामगिरीसाठी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांना सलग दुसऱ्यांदा 'संसदरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबरोबरच राज्यसभेत एकूण कामगिरीमध्ये 'ओव्हर ऑल टॉपर' म्हणूनही त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्राईम पॉईंट फाउंडेशनच्या वतीने लोकसभा आणि राज्यसभेतील उल्लेखनीय कार्याबद्दल दरवर्षी खासदारांना 'संसदरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. या पुरस्कारांचे यंदा १६ वे वर्ष होते.

माजी सरन्यायाधीश भूषण गवई, केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी, केंद्रीय राज्यमंत्री सुकांत मजुमदार, पुरस्कार ज्युरी समितीचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या पुरस्काराचे वितरण झाले. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत सक्रिय सहभाग नोंदवत सर्वच आघाड्यांवर उल्लेखनीय व लोक-देशहिताचे मुद्दे मांडत प्रभावी कामगिरी केली. सर्वोत्तम कामगिरीसाठी डॉ. कुलकर्णी यांना सलग दुसऱ्या वर्षी हा पुरस्कार मिळाल्याने महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः पुण्यासाठी ही गौरवाची बाब ठरली आहे. त्यांच्यासमवेत महाराष्ट्रातून भाजपचे हेमंत सावरा, स्मिता वाघ, शिवसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे व नरेश मस्के यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा. कुलकर्णी यांनी रेल्वे, महिला सुरक्षा, आरोग्य, ग्रामीण विकास, शिक्षण, सामाजिक न्याय, कॉर्पोरेट जिहादच्या संबंधित विषयांवर संसदेमध्ये सातत्याने मुद्देसूद भाष्य केले आहे. विशेष सत्रात, झिरो अवर, प्रश्नोत्तरे व विविध विषयांवरील चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवला आहे.



नुकत्याच झालेल्या अधिवेशनात त्यांनी महिला सुरक्षा, विमा सुरक्षा, रेनवॉटर हार्वेस्टिंग, आधार प्रमाणीकरण, आरटीई प्रवेश प्रक्रिया, शेतजमिनी याबाबत लक्षवेधी मांडल्या.

या पुरस्काराबाबत बोलताना प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "संसदेतील सक्रिय सहभाग, जनहिताचे प्रश्न आणि संसदीय कामकाजातील योगदानाची दखल घेत हा पुरस्कार दिल्याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. हा पुरस्कार पक्षनेतृत्वाचा विश्वास, जनतेचे आशीर्वाद आणि सहकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याची पावती आहे. त्याचबरोबर हा सन्मान समाधानासोबतच संसदीय जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करणारा आहे. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेने सुरू झालेला हा पुरस्कार माझ्यासाठी विशेष महत्त्वाचा आहे. संसदेत जनहिताचे प्रश्न, धोरणात्मक विषय तसेच पर्यावरण, विज्ञान, विकास आणि राष्ट्रहिताशी निगडित मुद्दे सातत्याने मांडण्याच्या प्रयत्नांची ही महत्त्वपूर्ण पावती आहे."

राज्यसभेच्या माध्यमातून देशसेवेची संधी देऊन सातत्याने मार्गदर्शन आणि विश्वास देणारे आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करीत संसद हे केवळ लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ नाही, तर जनतेच्या अपेक्षा आणि राष्ट्राच्या विकासदृष्टीला दिशा देण्याचे प्रभावी माध्यम आहे. या व्यासपीठाचा अधिकाधिक प्रभावी आणि विधायक उपयोग करून समाजहित, पर्यावरणसंवर्धन आणि राष्ट्रविकासासाठी कार्य करण्याचा माझा संकल्प अधिक दृढ झाला असल्याचे त्या म्हणाल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे



### त्र्यंबक नगरपरिषदेने घनकचऱ्यासाठीची १३ कोटींची मागणी घेतली मागे

**नाशिक/त्र्यंबकेश्वर - : दैनिक संध्या**

श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या भाविकांच्या देणगीतून प्राप्त झालेला १३ कोटी रुपयांचा निधी त्र्यंबक नगरपरिषदेकडे घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्याच्या प्रस्तावाला 'मंदिर महासंघ, महाराष्ट्र' यांनी केलेला कायदेशीर विरोध यशस्वी ठरला आहे. भाविकांनी अर्पण केलेला पैसा केवळ देवस्थान आणि हिंदू संस्कृतीच्या संवर्धनासाठीच वापरला जावा, तो नागरी कामांसाठी वळवणे कायदेशीरदृष्ट्या अयोग्य आहे, अशी ठाम भूमिका महासंघाने घेतली होती. या अनुषंगाने राज्याचे मुख्यमंत्री, विधी व न्याय राज्यमंत्री व धर्मादाय आयुक्त यांना सविस्तर निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत विधी व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी धर्मादाय आयुक्तांना या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. शासनाकडून सुरू झालेल्या या चौकशीमुळे आणि मंदिर महासंघाच्या अभ्यासपूर्ण विरोधामुळे अखेर नगरपरिषदेला १३ कोटी रुपयांच्या निधीची मागणी मागे घ्यावी लागली आहे. या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी मंदिर महासंघाच्या शिष्टमंडळाने नगरपरिषद त्र्यंबकेश्वरचे मुख्याधिकारी श्री. गोविंद जाधव व नाशिक येथील सहधर्मादाय आयुक्त यांची भेट घेतली. या वेळी महासंघाने आपला विरोध दर्शवणारे महत्त्वाचे कायदेशीर व प्रशासकीय मुद्दे निदर्शनास आणून दिले. नाशिकच्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी शासनाने ३४ हजार कोटींचा निधी मंजूर केला असून, त्यापैकी २७७ कोटी रुपये केवळ त्र्यंबकेश्वरच्या रस्ते व घनकचरा व्यवस्थापनासाठीच मंजूर आहेत, तसेच कचरा व्यवस्थापनासाठी भाविकांवर व नागरिकांवर कर आकारून आवश्यक तो निधी उभा करण्याचा कायदेशीर अधिकार त्र्यंबक नगरपरिषदेला आहे. याशिवाय कायद्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या एकूण भांडवली खर्चापैकी २५ टक्के निधी घनकचरा व्यवस्थापनासाठी राखून ठेवणे बंधनकारक असते. हे सर्व प्रशासकीय व आर्थिक पर्याय उपलब्ध असताना घनकचरा व्यवस्थापनासाठी देवस्थानच्या निधीची मागणी करणे सर्वथा अयोग्य असल्याचे महासंघाने सप्रमाण स्पष्ट केले.

### विज्ञान प्रयोगशाळेतून समाजापर्यंत पोहोचवावे

**मुंबई: दैनिक संध्या**

वैज्ञानिक संशोधन आणि नवोन्मेष केवळ प्रयोगशाळा आणि शोधनिबंधांपुरते मर्यादित न राहता समाजासमोरील समस्या सोडविण्यासाठी उपयोगी ठरले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. रसायन तंत्रज्ञान संस्था (आयसीटी), माटुंगा, मुंबई येथे आयोजित हरित रसायनशास्त्र आणि शाश्वत अभियांत्रिकी विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेला ते संबोधित करीत होते. ज्येष्ठ वैज्ञानिक प्रा. एम. लक्ष्मी कांतम यांच्या सन्मानार्थ रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई आणि इंडियन केमिकल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. वैज्ञानिकांनी व्यवहार्य, परवडणारी आणि मोठ्या प्रमाणावर वापरता येतील अशी हरित तंत्रज्ञाने विकसित करण्यावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले. भारताच्या वेगाने विस्तारत असलेल्या उत्पादन आणि रसायन उद्योगांच्या पार्श्वभूमीवर, रसायन तंत्रज्ञान संस्था आणि इंडियन केमिकल सोसायटी यांसारख्या संस्थांनी भारताला हरित रसायनशास्त्र, उत्प्रेरण आणि शाश्वत रासायनिक अभियांत्रिकीचे जागतिक केंद्र बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.भारताने केवळ इतर देशांनी विकसित केलेले तंत्रज्ञान स्वीकारण्यापुरते मर्यादित न राहता, जगाने स्वीकारावे असे तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे, असेही राज्यपालांनी नमूद केले. रसायन तंत्रज्ञान संस्थेने दरवर्षी 'विज्ञान आणि समाज सप्ताह' आयोजित करावा, अशी विशेष सूचना राज्यपालांनी केली. या सप्ताहादरम्यान संस्थेने नागरिक, महाविद्यालये आणि शाळांसाठी आपली दालने खुली करावीत आणि संस्थेत सुरू असलेले संशोधन व नवोन्मेष सोप्या भाषेत सर्वसामान्यांना समजावून सांगावेत, असे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे विज्ञानावरील जनतेचा विश्वास वाढेल, तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होईल आणि प्रयोगशाळा व समाज यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील, असे राज्यपालांनी सांगितले. "विज्ञानाचा अंतिम उद्देश जनसेवा हाच आहे. आपल्या वैज्ञानिकांचे संशोधन कोणत्या क्षेत्रात सुरू आहे, ते कोणत्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि त्यांच्या संशोधनाचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग होऊ शकतो, याची माहिती नागरिकांना असली पाहिजे," असे राज्यपालांनी सांगितले.



### इनामगाव च्या लॉंड्री व्यावसायिक दळवी दांपत्याच्या माणुसकी तुन श्रीमंती

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

शिरूरच्या पूर्व हगील इनामगाव येथील गोकुळ व वनिता दळवी या लॉंड्री व्यावसायिक दांपत्याने लाखो रुपये किमतीचा सोन्याचा गंठण प्रामाणिकपणे परत करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. लॉन्ड्रीच्या कामादरम्यान कपड्यांमध्ये अडीच तोळ्यांचा सोन्याचा गंठण आढळले. मात्र, आर्थिक परिस्थिती बेताची असूनही या दांपत्याने सोन्याच्या मोहाला बळी न पडता संबंधित मालकाचा शोध घेतला आणि दागिना त्यांच्याकडे सुपूर्द केला. दागिना सापडल्यानंतर त्यांनी गावातील विजय मोकाशी, प्रदीप पवार व गोविंद नलगे यांना माहिती दिली. त्यानंतर शोध घेतला असता हा गंठण सागर काळे यांचे असल्याचे समोर आले. दळवी दांपत्याने कोणतीही अपेक्षा न ठेवता तो दागिना प्रामाणिकपणे काळे त्यांच्या स्वाधीन केला.आजच्या काळात लाखोंचा दागिना हातात सापडल्यानंतरही त्याचा मोह न करता तो परत करण्याची कृती निश्चितच कौतुकास्पद,आदर्शवत आहे. दळवी दांपत्याच्या या प्रामाणिकपणाचे इनामगावसह परिसरातून कौतुक होत आहे.या उल्लेखनीय प्रामाणिकपणाबद्दल ग्रामस्थ, चंदू काका सराफ अँड कंपनी, दौंडचे सोनकशेठ शहा आणि सरपंच अनुराधा घाडगे यांच्या वतीने दळवी दांपत्याचा सन्मान करण्यात आला. "सोन्याचा गंठण लाखोंचा होता; पण तो परत करणाऱ्या दळवी दांपत्याच्या मनाची श्रीमंती करोडोंची आहे!" अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



# रोटरी गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२६ वितरण सोहळा संपन्न

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव येथे रोटरी क्लब नारायणगावच्या वतीने जुन्नर तालुक्यातील विविध शाळेतील उपक्रमशील शिक्षकांना "रोटरी गुणवंत शिक्षक पुरस्कार 2026" देऊन सन्मानित करण्यात आल्याची माहिती रोटरी क्लब नारायणगावचे अध्यक्ष अमित बेनके व फर्स्ट लेडी धनश्री बेनके यांनी दिली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामोन्नती मंडळाच्या विश्वस्त मोनिका मेहेर,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व मार्गदर्शिका राजश्री बेनके, नारायणगाव कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी,शिक्षण विस्तार अधिकारी अनिता शिंदे,रोटरी प्रेसिडेंट इलेक्ट प्रशांत ब्रम्हे,ग्रामपंचायत सदस्य हेमंत कोल्हे,द्राक्ष बागायतदार राहुल बनकर,संजय कानडे,विविध शाळांचे मुख्याध्यापक,शिक्षक वृंद,रोटरी क्लब नारायणगावचे सर्व रोटेरियन्स,सर्व ॲन्स,आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आदर्श व गुणवंत शिक्षक रमाकांत कवडे,विजय नागरे,सुरेखा बटवाल,राहुल नवले,स्वागता वाजगे,माधुरी बनकर,चैताली आवटे,विवेक बोरसे,छाया गायकवाड,शुभांगी वाबळे,अमिन पठाण,रंजना पिल्ले,मंगल फुलसुंदर,सिमा सोनवणे,रिना शेनॉय व प्रिया दरेकर या १६ उपक्रमशील शिक्षकांना सन्मानचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी,विश्वस्त मोनिका मेहेर,क्लबचे अध्यक्ष अमित बेनके,पुरस्कारार्थी शिक्षक रमाकांत कवडे व राहुल नवले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन हेमंत महाजन,मंगेश मेहेर,योगेश भिडे,तेजस वाजगे,निर्मला मेहेर,सिमा महाजन,सचिन घोडेकर,लहू गायकवाड,विवेक नाईक,भरत चिलप,वैभव बेनके,डॉ.केतकी काचळे,अमृता भिडे,रेखा ब्रम्हे,प्रियांका बोरकर,अश्विनी वाजगे,रिनाली वामन,माधवी चिलप व मनाली नाईक यांनी केले.

## सणासुदीचा उत्साह आणि परंपरांना समर्पित 'अगरबत्ती बोले' मोहीम सुरू: सायकल प्युअर अगरबत्ती

**■ मुंबई (दै. संध्या)**

सणासुदीच्या काळात पूजा, उत्सव आणि परंपरांचा सुगंध भारतीय घरांमध्ये एका अनोख्या पद्धतीने पोहोचवण्यासाठी, अगरबत्तीची जगातील सर्वात मोठी उत्पादक कंपनी, सायकल प्युअर अगरबत्तीने महाराष्ट्रात 'अगरबत्ती बोले' मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचा उद्देश हा आहे की, अगरबत्ती केवळ सुगंधाचे माध्यम नसून, ती आठवणी, भावना आणि पिढ्यांना जोडणारी एक परंपरा आहे. या मोहिमेची मूळ संकल्पना ही आहे की, अगरबत्ती केवळ जागेला सुगंधित करत नाही, तर भावना, आठवणी आणि परंपरांनाही जिवंत करते. या माध्यमातून, ब्रँड ग्राहकांच्या नवीन पिढीशी आपले नाते अधिक घट्ट करत आहे आणि भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरांमधील सुगंधाचे महत्त्व अधोरेखित करत आहे. सायकल प्युअर अगरबत्तीचे व्यवस्थापकीय संचालक, अर्जुन रंगा म्हणाले, "७७ वर्षांपासून सुगंध हा आमच्या प्रवासाचा अविभाज्य भाग राहिला आहे. अगरबत्ती केवळ पूजेची वस्तू नाही, तर सण, कौटुंबिक मेळावे आणि पिढ्यानपिढ्या जपलेल्या




आठवणींचाही एक भाग आहे. 'अगरबत्ती बोले'च्या माध्यमातून आम्हाला हे भावनिक नाते साजरे करायचे आहे. आमचा वारसा जपून आणि आजच्या पिढीसाठी समर्पक अनुभव निर्माण करत, बदलत्या ग्राहकांच्या पसंतीनुसार स्वतःमध्ये बदल घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे." त्यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्र ही कंपनीसाठी एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. कंपनी आधुनिक रिटेल, ई-कॉमर्स आणि क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून राज्यात आपला विस्तार करत आहे. सात्विकच्या अलीकडील अधिग्रहणामुळे, कंपनीने भारतात एक संपूर्ण आध्यात्मिक आणि धार्मिक समाधान प्रदाता बनण्याच्या दिशेनेही पाऊल टाकले आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून, कंपनीने दसरा, यज्ञ आणि वुड्स प्रकारांमध्ये बांबू-मुक्त घन अगरबत्ती, गुलाब आणि जाईच्या सुगंधात मेदिनी ट्विन कप सांब्राणी आणि सहा प्रीमियम सुगंधांसह रॉयल सिरीज सादर केली आहे. ही कंपनी दरवर्षी १२ अब्जाहून अधिक अगरबत्त्यांचे उत्पादन करते आणि जगभरातील लाखो घरांमध्ये श्रद्धेचा सुगंध पोहोचवते. भारतात तिचे ५,००० हून अधिक वितरक आणि ५,००,००० हून अधिक किरकोळ विक्री केंद्रे असून, ती ७५ हून अधिक देशांमध्ये कार्यरत आहे.

सामाजिक कार्यांच्या क्षेत्रात, एनआर फाउंडेशन शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, पर्यावरण आणि सामुदायिक कल्याणाशी संबंधित उपक्रम राबवते. महाराष्ट्रातील गडचिरोली येथे महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत, हजारो आदिवासी महिलांना अगरबत्ती निर्मितीद्वारे उपजीविकेच्या संधी मिळाल्या आहेत. शाश्वत विकासाप्रती असलेल्या आपल्या वचनबद्धतेचा भाग म्हणून, ही कंपनी गेल्या १२ वर्षांपासून कार्बन न्यूट्रल आहे आणि अलीकडेच प्लॅस्टिक न्यूट्रल बनली आहे.

## एकीकडे गणेशोत्सवात पथकर सवलत, तर दुसरीकडे खाजगी बस प्रवासी वाऱ्यावर!

**■ मुंबई(दै. संध्या)**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी पथकर (टोल) सवलत लागू केली आहे. परंतु, शासनाकडून एकीकडे टोल सवलतीची घोषणा होत असताना, दुसरीकडे मात्र खाजगी बसेसने प्रवास करणाऱ्या हजारो चाकरमान्यांना प्रशासनाने पूर्णपणे वाऱ्यावर सोडल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. सुराज्य अभियानाने यापूर्वीही अनेकदा विविध माध्यमांतून प्रशासनाचे लक्ष वेधून कडक कारवाईची मागणी केली होती; मात्र प्रशासकीय दुर्लक्षामुळे आज ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या सर्व नियमित व विशेष रेल्वे गाड्यांचे आरक्षण महिनाभरापूर्वीच पूर्ण झाले आहे. तसेच एसटी महामंडळाच्या बसेसची संख्या व प्रवासी क्षमता मर्यादित असल्याने मोठ्या प्रमाणावर प्रवाशांना नाईलाजाने खाजगी कंत्राटी बसेसचा पर्याय निवडावा लागत आहे. याच परिस्थितीचा थेट गैरफायदा ऑनलाइन बस तिकीट बुकिंग एपच्या माध्यमातून खाजगी ट्रॅव्हल्स घेत असून ४००% ते १२००% पर्यंत बेकायदेशीर भाडेवाढ करत आहेत. रेड बस तिकीट बुकिंग पोर्टल वर मुंबई, पुणे आणि कोल्हापूरवरून कोकणात जाणाऱ्या सर्वच प्रमुख मार्गांवर रु. १,२०० ते रु. ३,९५७ पर्यंतची बेकायदेशीर दरवाढ दिसत आहे :

पुणे ते कणकवली मार्ग: १० सप्टेंबरचे भाडे रु. २,२१७ ते रु. २,५९९ - गणेशोत्सव आगमनाच्या दिवशी (११ सप्टें) ते थेट रु. ३,४०० ते रु. ४,४२१ पर्यंत (रु. १,८०० ची वाढ) वाढवण्यात आले आहे. मुंबई (सायन) ते सिंधुदुर्ग मार्ग: ९ सप्टेंबरचे मूळ भाडे रु. १,१०० असताना, ११ सप्टेंबर रोजी रु. ४,२७६ आकारले जात आहे (रु. ३,१७६ ची थेट वाढ). कोल्हापूर ते कांकवली मार्ग: ९ सप्टेंबरचे मूळ भाडे रु. ३६० वरून ११ सप्टेंबरसाठी थेट रु. ४,३१७ प्रति सीट (रु. ३,९५७ ची प्रचंड वाढ) आकारले जात आहे. मोटार वाहन कायदा (कलम ६७) नुसार खाजगी बसेसचे कमाल भाडे एसटीच्या मूळ भाड्याच्या १.५ पट (५०% अधिक) असणे बंधनकारक असताना ऑनलाइन मात्र अवाढव्य दराने तिकीट विक्री सुरू आहे.

## हिंदु विधीज्ञ परिषदेची अभिनेत्री स्वरा भास्कर अहमद यांना कायदेशीर नोटीस !

**■ मुंबई (दै. संध्या)**

राणी पद्मावती यांसह अन्य हिंदू रजपूत स्त्रियांनी शीलरक्षणासाठी केलेल्या 'जोहार'ला भित्रेपणा म्हणणाऱ्या अभिनेत्री स्वरा भास्कर अहमद यांना हिंदू विधीज्ञ परिषदेने कायदेशीर नोटीस पाठवली आहे. २५ लाख रुपयांची हानी भरपाई आणि भविष्यात हिंदूंच्या श्रद्धास्थानांविषयी अवमानकारक वक्तव्य न करण्याची ग्वाही, अशी मागणी नोटीसेद्वारे करण्यात आली आहे. हिंदू धर्मप्रेमी श्री. रमेश कडगले यांच्या सूचनेनुसार हिंदु विधिज्ञ परिषदेचे अधिवक्ता अनेश परळकर यांनी ही नोटीस पाठवली आहे.

३१ ऑगस्ट या दिवशी 'इंडिया इंटरनॅशनल सेंटर'मधील एका कार्यक्रमात 'पद्मावती' या हिंदी चित्रपटातील 'जोहार'च्या प्रसंगाचे वर्णन करताना अभिनेत्री स्वरा भास्कर अहमद यांनी आक्षेपार्ह विधान केले होते. या प्रकरणी पाठवण्यात आलेल्या नोटीसीमध्ये म्हटले आहे की, राज्यघटनेने दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे अमर्याद नसून वाजवी मर्यादांच्या अधीन आहे. स्वरा भास्कर अहमद यांनी मात्र वक्तव्यातून महाराणी पद्मावती आणि 'जोहार' करणाऱ्या वीरांगना यांचे शौर्य, त्याग व आत्मसन्मान यांचा अवमान झाला आहे. माझ्यासह जगभरातील हिंदू आणि रजपूत समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक भावना यामुळे दुखावल्या आहेत. त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई केली जावी.

इंडियनऑइल ने एनपीसीआय आणि टोनटॅग यांच्या सहकार्याने टाटा डॉट कार्स साठी भारतातील पहिले

## इन-कार फ्युएल पेमेंट सोल्यूशन लॉंच केले

**■ मुंबई (दै. संध्या)**

इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड ने एनपीसीआय आणि टोनटॅग यांच्या सहकार्याने टाटा डॉट कार्स साठी इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सवर भारतातील पहिले इन-कार पेमेंट सोल्यूशन लॉंच केले आहे. हे लॉंच ग्लोबल फिनटेक फेस्ट (जीएफएफ) 2026 दरम्यान करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्राहकांना त्यांच्या कनेक्टेड वाहनांच्या डॅशबोर्डद्वारे थेट आणि सुरक्षितपणे इंधनाचे पेमेंट करता येणार आहे. हा उपक्रम मोबिलिटी क्षेत्रातील डिजिटल पेमेंटचा अनुभव अधिक प्रगत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे सोल्यूशन एनपीसीआय च्या यूपीआय सर्कल फ्रेमवर्कमधील "इंट्रोडक्शन ऑफ आयओटी डिव्हाईसेस अँड सॉफ्टवेअर ऑन द यूपीआय इकोसिस्टिम" या उपक्रमाचा लाभ घेत असून, कनेक्टेड वाहनांद्वारे पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देते. इंधन भरल्यानंतर ग्राहकांना स्वतंत्र मोबाइल ॲप, कार्ड किंवा इतर कोणत्याही पेमेंट पद्धतीचा वापर न करता त्यांच्या वाहनाच्या इंटरफेसद्वारे व्यवहार पूर्ण करता येईल. या सोल्यूशनमध्ये इंडियनऑइल च्या एक्स्ट्रारिवॉर्ड्स लॉयल्टी कार्यक्रमाचेही एकत्रीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र ग्राहकांना व्यवहारादरम्यान आपला मोबाइल क्रमांक शेअर न करता रिवॉर्ड पॉइंट्स मिळवता येतील.इंडियनऑइल चे विस्तृत इंधन रिटेल नेटवर्क,टाटा डॉट कार्स ची कनेक्टेड वाहन परिसंस्था आणि एनपीसीआय ची विश्वासार्ह डिजिटल पेमेंट पायाभूत सुविधा यांना एकत्र आणून, हा उपक्रम इंधन भरण्याची प्रक्रिया अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आला आहे. हे सहकार्य भारताच्या कनेक्टेड मोबिलिटीच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या माध्यमातून इंडियनऑइल आपल्या रिटेल आउटलेट्सवर इन-कार पेमेंट अनुभव सुरू करणारा देशातील पहिला इंधन रिटेलर ठरला आहे. तसेच, भविष्यात वाहनामधूनच विविध प्रकारची पेमेंट्स, कॉमर्स आणि डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी यामुळे एक भक्कम पाया तयार झाला आहे.

# जेजुरीकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने 'मल्हार दहीहंडी महोत्सव' यशस्वी

**■ जेजुरी(दै. संध्या)**

रक्षाबंधनानिमित्त जेजुरीतील महिला भगिनींसाठी आयोजित 'मल्हार दहीहंडी महोत्सवाला' महिलांसह जेजुरीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आकर्षक पारितोषिके, लकी ड्रॉ आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे महोत्सवाने जेजुरीकरांचे लक्ष वेधून घेतले.

जेजुरी शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी आयोजित लकी ड्रॉमध्ये ज्युपिटर स्कूटी, गोदरेज फ्रिज, फ्लोअर मिल मशीन, सोन्याची नथ, चांदीचे करंडे आणि पैठणी साडी यांसह विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. या लकी ड्रॉमध्ये जेजुरी येथील सुनंदा न लांघी या ज्युपिटर स्कूटीच्या विजेत्या ठरल्या. भरघोष बक्षिसांमुळे महिला भगिनींमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

महिलांची मोठी उपस्थिती आणि नागरिकांची मोठी गर्दी यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. महोत्सवाच्या आयोजनासाठी नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, वामनतात्या जगताप, उत्सवप्रमुख, आयोजक तसेच जेजुरी नगरपरिषदेचे नगरसेवक व नगरसेविका यांनी पुढाकार घेतला. विशेष म्हणजे, ध्वनीप्रदूषणाच्या नियमांचे पालन करत रात्री १० वाजता ध्वनिक्षेपक बंद करण्यात आला. त्यानंतर कोणतीही गाणी न वाजवता महिला भगिनी आणि नागरिकांच्या उपस्थितीत टाळ्यांच्या गजरात दहीहंडी फोडण्यात आली. कार्यक्रमाची शिस्तबद्ध सांगता झाल्याने आयोजकांचे कौतुक होत आहे. जेजुरीच्या विकासासोबतच सामाजिक, सांस्कृतिक आणि महिला-केंद्रित उपक्रमांना मिळालेला हा प्रतिसाद उल्लेखनीय असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन व्हावे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### पिंपळे सौदागरमध्ये शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते ‘कलाग्राम शॉपिंग फेस्टिव्हल’चा शुभारंभ

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपळे सौदागर येथील गोविंद गार्डनच्या बासुरी बँक्वेट हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘आपला आवाज आपली सखी’ प्रस्तुत कलाग्राम शॉपिंग फेस्टिव्हलचा दिमाखदार शुभारंभ भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी नगरसेविका अनितताई काटे आणि कुंदाताई भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. महिला उद्योजकांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच नागरिकांना सणासुदीच्या खरेदीची एकाच छताखाली संधी मिळावी, या उद्देशाने या तीन दिवसीय शॉपिंग फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. १० ते १२ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. उद्घाटन प्रसंगी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, “महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ‘कलाग्राम’सारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक खरेदीला प्रोत्साहन देणारे हे प्रदर्शन नागरिकांसाठी मोठी संधी आहे. महिला व नागरिकांनी या फेस्टिव्हलचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा.” या फेस्टिव्हलमध्ये आकर्षक साड्या, रेडिमेड कपडे, नवनवीन डिझाईन्सचे दागिने, ॲक्सेसरीज, विविध भेटवस्तू तसेच होम डेकोर उत्पादनांचे शेकडो स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. महिला उद्योजकांनी सादर केलेल्या विविध उत्पादनांना नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या उद्घाटन सोहळ्याला परिसरातील महिला उद्योजक, व्यावसायिक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सणासुदीच्या खरेदीसाठी आणि स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा धडा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ‘इ’ क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक ५ येथील एसपीजी इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजआळंदी रोड, भोसरी येथील विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेश प्रतिमा तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच मानवी साखळीच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करत हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला. महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा ७.० तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अभियानांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला. गणेशोत्सवात प्लास्टिकचा वापर टाळावा, नैसर्गिक व पर्यावरणपूरक सजावटीला प्राधान्य द्यावे आणि परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी हरित शिक्षक शपथ घेण्यात आली तसेच स्वच्छतेच्या घोषणांद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. “गणेशोत्सवाची भक्ती आणि उत्साह कायम ठेवत पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची जाणीव निर्माण झाल्यास हा संदेश कुटुंब आणि समाजापर्यंत पोहोचतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी पुढाकार घ्यावा,” असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**पिंपरी : दैनिक संध्या**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यकाळात प्रजेच्या कल्याणाला केंद्रस्थानी ठेवत न्याय, प्रशासन आणि सामाजिक सुधारणांना महत्त्व दिले, सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घेत त्यावर उपाययोजना करण्याची त्यांची कार्यपद्धती आजही आदर्श मानली जाते. महिला नेतृत्व, लोककल्याण आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा आदर्श त्यांनी निर्माण केला. त्यामुळे त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आणि त्यातून प्रेरणा घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस तसेच मोरवाडी, पिंपरी येथील स्मारकास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी नगरसदस्य राजू दुर्गे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते सदाशिव पडळकर, लक्ष्मण रुपनर, मुकुंद कुचेकर, दीपक भोजने, राहुल मदने, सोनाताई गडदे, भुजंग दुधाळे, माणिकराव बारगळ, शंकर दातीर, गणेश एकल, जयंत वायकुळे, रवींद्र कंकरे, सतीश खरात,वंदना धनगर आदी उपस्थित होते. सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या पुतळ्यास विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ह प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे,प्रभाग अधिकारी संतोष कोराड, अहिल्यादेवी सेवा संघाचे अध्यक्ष सचिन सरक, सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत गोफणे,अभिमन्यू गाडेकर, अजय दूधभाते, नवनाथ बीडे, छगन वाघमोडे, कृष्णराव गिरगुणे, संदिपान सामसे, रमेश गाढवे, गिरीश देवकाते, ज्ञानेश्वर मडबळ, प्राध्यापक गलांडे सर, बळीराम घोडके, महेंद्र लंबाते, नारायण भुरे, वाघमारे सर, अक्षय तिघाडे, भास्कर गाडेकर, अरविंद टेकाळे, हरिश्चंद्र गायके उपस्थित होते.

### नगरसेवक संदीप वाघेरे आक्रमक; फेरनिविदेसह चौकशीची आयुक्तांकडे मागणी

**पिंपरी : दैनिक संध्या**


पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात रस्ते व गटार सफाईच्या कामांसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निविदादारांमध्ये संभाव्य संगनमत अथवा ‘रिंग’ झाल्याचा संशय व्यक्त होत असल्याने, सदर निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने खुल्या, पारदर्शक व व्यापक स्पर्धात्मक पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. सदर निविदा प्रक्रिया आज पूर्ण झाल्यानंतर संदीप वाघेरे यांनी आयुक्तांना निवेदन सादर केले. या निविदांना मोठा आर्थिक घोटाळा असून त्याचा थेट संबंध महानगरपालिकेच्या सार्वजनिक निधीशी तसेच शहराच्या स्वच्छता व्यवस्थेशी आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया केवळ तांत्रिकदृष्ट्या पूर्ण होणे पुरेसे नसून ती वास्तविक, खुली आणि निष्पक्ष स्पर्धेतून पार पडली आहे का, याची खातरजमा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने निविदादारांमध्ये परस्पर संगनमत होऊन ‘रिंग’ निर्माण झाल्याचा संशय व्यक्त होत असल्याने निविदा प्रक्रियेत अपेक्षित व वास्तविक स्पर्धा झाली आहे किंवा नाही, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे उपलब्ध निविदा अभिलेख, निविदादारांची माहिती, आर्थिक बोलींचे स्वरूप आणि इतर संबंधित निदर्शकांची स्वतंत्र व वस्तुनिष्ठ पद्धतीने छाननी करण्याची मागणी वाघेरे यांनी केली आहे.

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेला दोन महिने; कचरा कोंडी कायम

## ९ कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतरही पर्यायी डेपोचा प्रश्न अनुत्तरीत; दहा कचरा प्रक्रिया केंद्रे अद्याप कागदावरच

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर संपूर्ण शहरात कचरा समस्या निर्माण झाली आहे. त्या दुर्घटनेस दोन महिने पूर्ण होऊनही अद्याप शहरातील कचरा कोंडी सुटलेली नाही. त्यावरून महापालिका प्रशासन ठोस व कठोर भूमिका घेत नसल्याचे स्पष्ट होत आहे.



मोशी कचरा डेपोत 8 जुलैला झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा बळी गेला. तर, अनेक कर्मचारी जखमी झाले. त्या दिवसापासून त्या डेपोत कचरा टाकणाऱ्यांना सर्व वाहनांना प्रवेश देणे बंद झाल्याने अनेक ठिकाणी तात्पुरत्या ठिकाणी कचरा जमा केला जात आहे. अनेक भागांतील रस्ते व मोकळे मैदानात कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. त्यामुळे अस्वच्छतेसह दुर्गंधीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. संपूर्ण शहरात कचरा कोंडी निर्माण झाल्याने नागरिकांसह नगरसेवकांच्या तक्रारी वाढल्या आहेत.

त्यावर तोडगा म्हणून महापालिकेने काही दिवस देहूरोड आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या जागेत कचरा डम्प केला. मात्र, आठवड्याभराने त्यांनी परवानगी नाकारली. तसेच, मोशी डेपोत धोकादायकरित्या कचरा वाहतूक करण्यास वाहनचालकांनी नकार दिला होता. दुसरीकडे, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व दहा क्षेत्रीय कार्यालयानुसार दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात येतील, अशी घोषणा केली होती. त्या जागांचा शोध सुरू असून, त्यातील काही जागा निश्चित झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

असे असले तरी, दोन महिने उलटूनही अद्याप कचरा समस्या शंभर टक्के सुटलेली नाही. पर्यायी जागेचा अद्यापही शोध सुरू आहे. शहरात कचऱ्याचे ढीग, अस्वच्छता व दुर्गंधी असे चित्र कायम आहे. परिणामी, महापालिका प्रशासनाचे कामकाज गतीमान नसून, ठोस व कठोर भूमिका घेतली जात नसल्याचे चित्र आहे.

मोशी डेपोत संपूर्ण शहरात जमा झालेला 1 हजार 500 टन कचरा दररोज डम्प केला जात होता. केवळ 700 सुका टन कचरा जाळून त्यापासून वीज तयार केली जात होती. उर्वरित कचरा डम्प केला जात होता. त्यामुळे डेपोत चारी बाजूने कचऱ्याचे डोंगर तयार झाले असून, ते धोकादायक स्थितीत आहेत. बायोमायनिंगद्वारे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम संथ गतीने सुरू असल्याने कचऱ्याचे डोंगर अजूनही दृष्टीस पडत आहेत.

मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी द्यावी. वेस्ट टू एनर्जी कंपनीकडून वारसांना प्रत्येकी 40 लाख रुपयांची भरपाई देणे. वारसांचा विमा काढणे, सर्व पाल्यांच्या शिक्षणांची जबाबदारी घेणे, घर देणे आदी वारसांच्या मागण्या अद्यापही अपूर्ण आहेत.

महापालिकेकडून सर्व दहा क्षेत्रीय कार्यालयात एक असे एकूण दहा कचरा प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात येणार होते. मात्र, दोन महिने उलटूनही अद्याप एकही केंद्र सुरू करण्यात महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागास यश आलेले नाही. जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असे उत्तर अधिकाऱ्यांकडून दिले जात आहे.

संपूर्ण शहराचा कचरा मोशी कचरा डेपोत आणून टाकला जातो. त्या डेपोची क्षमता संपली आहे. त्यामुळे शहरात पुनावळे येथील वन विभागाच्या जागेत पर्यायी कचरा डेपोचे आरक्षण टाकण्यात आले होते. महापालिकेने एप्रिल 2025 ला प्रसिद्ध केलेल्या प्रारूप सुधारित डीपीत कचरा डेपोचे आरक्षण दिसत नाही. शहराच्या पर्यायी डेपोबाबत सत्ताधाऱ्यांसह प्रशासनाने चुकी साधल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मोशी डेपो दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेची राज्यभरात प्रतिमा मलीन झाली आहे. या प्रकरणात अँन्टोनी लारा रिन्युव्हेबल एनर्जी प्रा. लि. ठेकेदार कंपनीच्या दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. तर, महापालिकेचे पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी व कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट तसेच, अग्निशामक विभागाचे अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांना निलंबित केले आहे. त्यांची खातेनिहाय चौकशी सुरू आहे.

मात्र, अद्याप दुर्घटनेची जबाबदारी कोणावरही निश्चित करण्यात आलेली नाही. त्यावरून केवळ चौकशीच्या फेऱ्यात प्रशासन अडकल्याचे दिसत आहे.

### चौकशी समितीचे अहवालाकडे लक्ष

या दुर्घटनेची सखोल, तांत्रिक चौकशी करून दुर्घटनेस कारणीभूत असलेल्या बाबींची तपासणी करण्यासाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने 13 जुलैला पुण्याच्या विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती नेमली आहे. समितीला एक महिन्यात प्राथमिक व दोन महिन्यात अंतिम अहवाल देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, समितीने घटनास्थळाची पाहणी, महापालिका अधिकारी, ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी, तांत्रिक तज्ज्ञ आणि प्रत्यक्षदर्शी कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविले. प्रकल्पाची मंजुरी, सुरक्षा परवानग्या, संरचनात्मक आराखडे आणि देखभाल नोंदींचीही तपासणी केली. या सर्वांचा आधार घेत प्राथमिक अहवाल तयार करून 14 ऑगस्टला राज्य शासनाला सादर केला आहे. येत्या सोमवारी (दि.14) अंतिम अहवाल येणे अपेक्षित आहे. त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कचरा प्रक्रिया केंद्रांसाठी शहरातील जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. त्याची यादी आयुक्तांकडे सादर केली आहे. पदाधिकारी व स्थानिक नगरसेवकांना विश्वास घेऊन त्या जागा अंतिम केल्या जाणार आहे. डीपीआर तयार करून तांत्रिक बाजू तपासून तेथे कचरा प्रक्रिया केंद्र सुरू केले जाईल. त्यासोबत कोणत्या तंत्रज्ञानानुसार कचरा प्रक्रिया करायची याचा पडताळणी केली जात आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष केंद्र कार्यान्वित केली जातील, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले. गणेशोत्सवानिमित्त शहर स्वच्छ करण्याचे नियोजन आखण्यात आले आहे. त्यानुसार, आरोग्य विभागाकडून सफाई मोहीम राबवली जात आहे. रस्ते व पदपथावर कचरा दिसल्यास तो तत्काळ उचलून घेतला जात आहे. त्यानुसार, आवश्यक प्रमाणात वाहनांची संख्या वाढवण्यात येत आहेत. गणेशोत्सवात संपूर्ण शहर स्वच्छ व सुंदर करण्यात येणार आहे, असे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

## वाकडमध्ये २५ किलोहून अधिकच्या गांजासह तिघांना अटक

■ **पिंपरी (दै. संध्या)**

वाकड पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत विक्रीसाठी आणलेला २५ किलोहून अधिक गांजा जप्त केला असून तिघांना अटक केली आहे. या कारवाईत गांजा, कार आणि मोबाईलसह एकूण २३ लाख ६३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाकड येथील कस्पटे चौकाजवळ मुळा नदीवरील अर्धवट तयार पुलाजवळ काही व्यक्ती मोठ्या प्रमाणात गांजा घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वाकड पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. या कारवाईत आबा मल्हारी खलाटे, प्रमोद भीमराव गरुडकर आणि गोरक्षनाथ शिवाजी वाळके या तिघांना रंगेहात पकडण्यात आले. झडतीदरम्यान आरोपींकडून १२ लाख ९३ हजार रुपये किमतीचा २५ किलो ८६५ ग्रॅम गांजा, एक कार आणि मोबाईल फोन असा एकूण २३ लाख ६३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस शिपाई वंदू गिरे यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींविरुद्ध अंमली पदार्थविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

## गणेशोत्सवात पुणे मेट्रोची विशेष सेवा

■ **पिंपरी (दै. संध्या)**

गणेशोत्सवाच्या काळात पुण्यात येणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सोयीस्कर व्हावा यासाठी पुणे मेट्रो प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन मेट्रोच्या फेऱ्यांची संख्या वाढविण्यात आली असून गर्दीच्या वेळेत दर ५ मिनिटांनी मेट्रो सेवा उपलब्ध राहणार आहे.

पुणे मेट्रोच्या माहितीनुसार, १४ ते १६ सप्टेंबर (गणेश चतुर्थी ते बुधवार) या कालावधीत मेट्रो सेवा नियमित वेळेनुसार सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू राहील. त्यानंतर १७ ते २४ सप्टेंबर दरम्यान भाविकांच्या सोयीसाठी विशेष वेळापत्रक लागू करण्यात आले असून मेट्रो सेवा सकाळी ६ ते मध्यरात्री २ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस असलेल्या अनंत चतुर्दशी (२५ सप्टेंबर) रोजी पुणे मेट्रोचा इतिहास घडणार असून सकाळी ६ वाजल्यापासून २६ सप्टेंबरच्या रात्री ११ वाजेपर्यंत म्हणजेच सलग ४१ तास अखंड मेट्रो सेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. २७ सप्टेंबरपासून सेवा पुन्हा नियमित वेळेनुसार सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू राहील. गणेशोत्सव काळात मध्यवर्ती पुण्यातील गर्दीचे नियोजन करण्यासाठी पुणे मेट्रोकडून विशेष आवाहन करण्यात आले आहे. मार्गिका १ वरील प्रवाशांनी पेठ भागातील गणपती दर्शनासाठी कसबा पेठ मेट्रो स्थानकाचा वापर करावा. मार्गिका २ वरून येणाऱ्या भाविकांनी वनाज बाजूकडून येत असल्यास डेक्कन जिमखाना, तर रामवाडी बाजूकडून येत असल्यास PMC मेट्रो स्थानकावर उतरावे. महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकावर गर्दी टाळण्यासाठी हे स्थानक मुख्यत्वे परतीच्या प्रवासासाठी वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच १४ ते २६ सप्टेंबर दरम्यान हे स्थानक एकदिशात्मक (Unidirectional) पद्धतीने कार्यरत राहणार आहे.

## पिंपरी चिंचवडमध्ये पुणे लेगसी लायन्स क्लबची स्थापना

■ **पिंपरी (दै. संध्या)**




पिंपरी चिंचवडमध्ये पुणे लेगसी लायन्स क्लब हा नवीन क्लब सुरू होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. एका क्लब मधून दुसरा क्लब तयार होतो, तेव्हा नवीन ऊर्जा निर्माण होते. लीडर होण्यासाठी युवकांनी छत्रपती शिवाजी महाराज, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली याचा आदर्श घ्यावा. नम्र, प्रामाणिक, संभाषण कौशल्य, जोखीम पत्करण्याची तयारी ठेवणे गरजेचे आहे. युवकांना क्लबमध्ये येण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मालपाणी उद्योग समुहाचे ज्येष्ठ उद्योजक लायन गिरीश मालपाणी यांनी केले. पिंपरी चिंचवड शहरात लायन्स क्लब ऑफ पुणे लेगसी या नवीन लायन्स क्लबची स्थापना करण्यात आली असून, या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन मालपाणी उद्योग समूहाचे ज्येष्ठ उद्योजक लायन गिरीश मालपाणी आणि लायन सुनिता मालपाणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन श्रेयस दीक्षित, लायन राजेंद्र मुच्छल, लायन सलीम सिकलगार, लायन विद्या वखारे आदी उपस्थित होते. नवीन लायन क्लबचे चार्टर प्रेसिडेंट म्हणून लायन राकेश पिल्ले, सचिव म्हणून लायन रविराज साबळे, लायन जितेश वखारे यांनी सूत्रे हाती घेत शपथ घेतली. लायन सुनीता मालपाणी यांनी नवीन कार्यकारिणीला शपथ दिली. यावेळी जिल्ह्यातील सर्व लायन्स क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

## तीन दुचाकी चोरीचे गुन्हे उघड, सराईत आरोपीला अटक

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट-३ ने उल्लेखनीय कामगिरी करत मोटारसायकल चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणले असून एका सराईत आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून सुमारे १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या निर्देशानुसार गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू होता.

त्याच अनुषंगाने ८ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखा युनिट-३ चे पथक मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करत असताना पोलीस अंमलदार अजित रुपनवर व त्यांच्या सहकाऱ्यांना गोपनीय माहिती मिळाली. चिखली येथील घरकुल परिसरात एक रेकॉर्डवरील आरोपी चोरीच्या दुचाकींची विल्हेवाट लावत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव जॉर्डन राजेश साळवे (वय २०, रा. घरकुल, चिखली) असे सांगितले.


## देहूरोडमध्ये ‘लाल मातीचा बाप्पा’! पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना भक्तांची पसंती

■ **देहूगाव (दै. संध्या)**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने देहूगाव व देहू रोड परिसरातील गणेशमूर्ती कलाकारांच्या कार्यशाळांमध्ये लगबग वाढली आहे. विविध आकार, आकर्षक रचना आणि वेगवेगळ्या उंचीच्या गणेशमूर्ती साकारण्याचे काम कलाकारांनी पूर्ण केले असून, सध्या बाजारात मूर्ती विक्रीसाठी आल्या आहेत.

गणेशमूर्तींना आकर्षक रंगसंगती देण्याबरोबरच डोळे, मुकुट, दागिने, वस्त्रालंकार आणि इतर बारकावे पूर्ण करण्यासाठी कलाकार दिवसरात्र मेहनत घेत आहेत. बाप्पाच्या मूर्तीवर शेवटचा हात फिरवून त्याला मोहक आणि प्रसन्न रूप देण्याचे काम सध्या सुरू आहे. देहूगाव व देहूरोड परिसरातील मूर्तिकारांनी यंदा भक्तांच्या आवडीनुसार पारंपरिक तसेच विविध संकल्पनांवर आधारित गणेशमूर्ती तयार केल्या आहेत. छोट्या घरगुती मूर्तींपासून मोठ्या सार्वजनिक मंडळांच्या मूर्तींपर्यंत विविध आकारांच्या मूर्ती कार्यशाळांमध्ये पाहायला मिळत आहेत.

णेशोत्सव जसजसा जवळ येत आहे, तसतशी मूर्तींच्या मागणीमध्येही वाढ होत असून, ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात बाप्पाच्या आगमनाची चाहूल देहूगाव-देहू रोड परिसरात स्पष्टपणे जाणवू लागली आहे. कलाकारांच्या हातातून साकारलेला बाप्पा आता भक्तांच्या घरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये विराजमान होण्यासाठी सज्ज झाला आहे.



यंदाच्या गणेशोत्सवात मात्र पारंपरिक मूर्तींसोबतच पर्यावरणपूरक लालमातीच्या गणेशमूर्तींना भक्तांकडून विशेष पसंती मिळत आहे. चेन्नई आणि तेलंगणातून आणलेल्या खास लालमातीसोबत मावळच्या भूमितील पवित्र माती आणि विविध नैसर्गिक घटकांचा वापर करून आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या जात आहेत. पर्यावरणपूरकतेसोबतच धार्मिक आणि नैसर्गिक घटकांचा सुंदर संगम या मूर्तींमध्ये पाहायला मिळत आहे. या गणेशमूर्तींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये गोमूत्र तसेच ११ पवित्र पत्री आणि विविध नैसर्गिक घटकांचा वापर करण्यात येत आहे. मूर्तींना रंग देताना रासायनिक रंगांना पूर्णपणे फाटा देण्यात आला असून, हळद, कुंकू, अष्टगंध आणि अबीर यांसारख्या नैसर्गिक रंगांचा वापर केला जात असल्याचे कलाकार मनोहर चक्रवर्ती यांनी सांगितले. लाल मातीपासून तयार केलेल्या या मूर्ती विसर्जनानंतर पाण्यात सहज विरघळतात.

त्यातून उरलेली माती झाडांसाठी खत म्हणून वापरता येत असल्याने ‘बाप्पाची भक्ती आणि पर्यावरणाची राखण’ असा दुहेरी संदेश या मूर्ती देत आहेत. दरम्यान, पीओपीच्या मूर्तींच्या विसर्जनामुळे निर्माण होणारे पर्यावरणीय प्रश्न आजही गंभीर आहेत.

प्लास्टर ऑफ पॅरिस पाण्यात सहज विरघळत नसल्याने त्याचे अवशेष विहिरी, तलाव तसेच पवना आणि इंद्रायणी नदीसारख्या जलस्रोतांमध्ये दीर्घकाळ राहतात. त्यात वापरलेल्या रासायनिक रंगांमुळे जलप्रदूषणाचाही धोका निर्माण होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्वीकारणे ही केवळ बदलती परंपरा नसून, निसर्गाप्रती असलेली जबाबदारीही आहे, असा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

विशेष म्हणजे, सहा इंचांपासून तब्बल सहा फूट उंचीपर्यंतच्या लालमातीच्या गणेशमूर्ती उपलब्ध आहेत. घरच्या घरी विसर्जन करता यावे, यासाठी त्याची सुविधाही देण्यात येत आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात देहूरोड परिसरात ‘लाल मातीचा बाप्पा’ भक्तांच्या घरोघरी विराजमान होण्याची शक्यता असून, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर देहूरोडमधून होताना दिसत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### चाकणला यंदा जिवंत देखाव्यातून तुफान समाज प्रबोधन

**चाकण : दैनिक संध्या**

सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांकडून देखाव्यांची जोरदार तयारी सुरू असून, चाकणला यंदा जिवंत देखाव्यातून तुफान समाज प्रबोधन होणार आहे. विषाचा घास अर्थात तुकाराम मुंढेचा फास, आमचं काय चुकलं, एकटा पडलेला बाप, मी कामाचाच माणूस अजित पवार या जिवंत देखाव्यांची मोठ्या प्रमाणात रेलचेल राहणार आहे. चाकण येथील महात्मा फुले चौकातील महात्मा फुले मित्र मंडळाने स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांची प्रेरणा घेऊन यंदा नगराध्यक्षा मनिषा गोरे व गटनेते नितीन गोरे आदींच्या मार्गदर्शनाखाली आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नारायण करपे लिखित " विषाचा घास अर्थात तुकाराम मुंढेचा फास " हा जिवंत देखावा सादर करणार आहेत. गोल्डन चौकातील नवयुग मित्र मंडळ यंदा नगरसेवक मंगेश कांडगे व उद्योजक योगेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून " आमचं काय चुकलं " हा जिवंत देखावा सादर करणार आहेत. धाडगे आळीतील त्रिमूर्ती मित्र मंडळ यंदा " एकटा पडलेला बाप " हा जिवंत देखावा सादर करणार आहेत. चाकण गावठाणातील नवनाथ मित्र मंडळ यंदा " मी कामाचाच माणूस अजित पवार " हा जिवंत देखावा सादर करणार आहेत. चाकण येथील माणिक चौकातील आझाद हिंद मंडळ, तळेगाव चौकातील शिवछत्रपती मित्र मंडळ, मार्केट यार्ड येथील श्री गणेश मित्र मंडळ, मयूर मित्र मंडळ, छत्रपती गणेश मंडळ, बाल गणेश मंडळ, यंग जाली क्लब, संग्राम दुर्ग मित्र मंडळ, समस्त बालवीर मंडळ आदी सार्वजनिक गणेश मंडळांची देखाव्यांची तयारी अंतीम टप्प्यात आली आहे. चाकण बाजारपेठेतील समस्त बालवीर मंडळ प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही पहिल्या दिवसापासूनच देखावा दाखवण्यास सुरुवात करणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संजय वाडेकर यांनी दिली. दरम्यान, गणेश उत्सव निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण नगरपरिषद हद्दीत पोलिसांचा कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

### श्रावण महोत्सवात महिला शक्तीचा जागर; एखतपूर-मुंजवडीची तेजश्री झुरंगे ठरली 'मिस पुरंदर क्वीन'

**पुरंदर : दैनिक संध्या**

भागीरथी लेडीज स्पेशल ड्राय क्लीनर्स, कला सिद्धी नृत्यालय आणि रोटरी क्लब ऑफ पुरंदर-सासवड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'श्रावण महोत्सव २०२६' उत्साहात पार पडला. सलग दुसऱ्या वर्षी झालेल्या या महोत्सवाने महिलांना आपले कलागुण सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देत महिला शक्तीचा जागर केला. सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहात झालेल्या या दिमाखदार कार्यक्रमात पारंपरिक कला, संस्कृती आणि सौंदर्याचे दर्शन घडले. या कार्यक्रमास रश्मी बागल-कोलते तसेच झी मराठीवरील 'कमळी' मालिकेतील बालकलाकार क्रिशा काकडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. महोत्सवात आयोजित 'मिस पुरंदर क्वीन २०२६' स्पर्धेत पुरंदर तालुक्यातील एखतपूर-मुंजवडी येथील तेजश्री काठूराम झुरंगे हिने प्रथम क्रमांक पटकावत मानाचा किताब आपल्या नावावर केला. तिच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण, आकर्षक पारंपरिक वेशभूषा आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर तिने हे यश मिळवले. तिच्या या यशासाठी मेकअप आर्टिस्ट अश्विनी राऊत यांनी विशेष मेहनत घेतली. इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असलेल्या तेजश्रीने शिक्षणासोबतच सांस्कृतिक क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली असून तिच्या यशामुळे संपूर्ण पुरंदर तालुक्याचा नावलौकिक वाढला आहे. लहान मुलांसाठी झालेल्या पारंपरिक वेशभूषा स्पर्धेत मुलांच्या गटात बालाजीच्या वेशभूषेतील कृष्णा खिलारी याने, तर मुलींच्या गटात कालिका मातेच्या वेशभूषेतील अलंक्रीता सायजू हिने प्रथम क्रमांक मिळविला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या डॉ. रेश्मा पवार, डीवायएसपी रश्मी सावंत आणि फार्मसी अभ्यासक्रमात महाराष्ट्रात प्रथम आलेल्या साक्षी टिळेकर यांना मानाचा 'आदिशक्ती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. महोत्सवातील लकी ड्रॉमध्ये पाच भाग्यवान महिलांना पैठणी साड्या देण्यात आल्या. तसेच जेजुरी येथील नवदुर्गा महिला मंडळाने मंगळागौरीचे पारंपरिक सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. स्पर्धेचे परीक्षण स्नेहा संकाये, मनीषा हिंगे आणि ललिता काकडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शुभम जगताप, लीना वढणे, धनश्री वढणे, स्वाती होले, इशा लोखंडे, वैशाली टपळे यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन किशोरी पवार, स्वानंद लोमटे आणि सपना पवार यांनी केले. तेजश्री झुरंगे हिच्या या यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### जुन्नर पोलीस प्रशासनाकडून तिळवण तेली समाज पलंग उत्सव समितीचा सत्कार

**जुन्नर : दैनिक संध्या**

दरवर्षी आई तुळजाभवानी मातेचा पलंग उत्सव उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडत पोलीस प्रशासनाला सहकार्य केल्याबद्दल जुन्नर पोलीस स्टेशनच्या वतीने जुन्नर तिळवण तेली समाज पलंग उत्सव समितीचा सत्कार करण्यात आला. यावेळी जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड साहेब व लोहकरे साहेब यांच्या उपस्थितीत समाजाचे अध्यक्ष श्री. कैलास गरिबे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संजय करपे, अविनाश कर्डिले, महेश घोडेकर, मोहन वालझाडे, गोकुळ भागवत, अनिल कर्डिले, महेश कर्डिले व दत्तात्रय कर्डिले हे उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड साहेब यांनी आई तुळजाभवानी मातेच्या पलंग उत्सवाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच उत्सवातील धार्मिक व सामाजिक उपक्रमांबाबत माहिती घेत त्यांनी समितीला शुभेच्छा दिल्या. "आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी आपण नक्कीच सहकुटुंब, सहपरिवार येऊ," असे सांगत त्यांनी समितीला उत्सवासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व मार्गदर्शन केले. तसेच सन २०२६ च्या पलंग उत्सवानिमित्त दहा दिवसांच्या कार्यक्रमाचे नियोजन, कायदा व सुव्यवस्था आणि सुरक्षा व्यवस्था याबाबत पोलीस प्रशासनाच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले.

# चाकण बाजारपेठेत मूर्ती खरेदीसाठी गणेश भक्तांची लगबग

■ चाकण (दै. संध्या)

गणरायाच्या आगमनासाठी अवघे मोजकेच दोन दिवस राहिल्याने चाकण बाजारपेठेत मूर्ती खरेदी करण्यासाठी अबाल वृद्धांसह तरुण गणेश भक्तांची झुंबड उडाली आहे.

चाकण शहरात मूर्ती विक्रेत्यांनी माणिक चौक, आंबेठाण चौक, तळेगाव चौक, मार्केट यार्ड परिसर, नगरपरिषद जवळ गणेश मूर्ती विक्रीसाठी स्टॉल लावले आहेत. गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर चाकण शहरात गणेश मूर्तींनी बाजारपेठा मोठ्या दिमाखात सजल्या आहेत. नगर, पेण, लालबाग, रायगड व रत्नागिरी आदी भागातून गणेश मूर्ती विक्रीसाठी आणल्या आहेत, असे उद्योजक मधुसूदन शेवकरी व माधव शेवकरी यांनी सांगितले. दगडूशेठ, राजे शाही थाटातील गणपती, आसनावरील गणपती, बहुरंगी गणपती त्याचप्रमाणे विविध अलंकार आणि सजवलेल्या मूर्ती गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे. गणेश मूर्ती विक्रेते माधव शेवकरी यांनी सांगितले की, " बाप्पांची मूर्ती निवडण्याकरिता गणेश भक्त आपल्या कुटुंबासह बाजारपेठेत दाखल होऊ लागले आहेत. गणेश मूर्तींच्या आगाऊ नोंदणीला प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने चाकण शहराला यात्रेचे स्वरूप आले आहे. अगदी शाडू माती पासून तसेच शेतातील काळे माती पासून तयार केलेल्या गणेश मूर्तींना ग्राहक व गणेश भक्तांकडून चांगली पसंती मिळत आहे. चाकणला यंदा पर्यावरणपूरक गणेश उत्सवावर नागरिकांचा प्रचंड भर असल्याचे दिसून येत आहे. गणेश मूर्तींच्या आकारमानानुसार आणि कलाकुसरी नुसार किमती निश्चित करण्यात आलेल्या आहेत." यावेळी नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेविका सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेवक साहेबराव कड, उद्योजक श्याम राक्षे, आदर्श शिक्षक नारायण करपे व शिवसेनेचे चाकण शहर प्रमुख महेश शेवकरी आदींनी शहरातील गणेश मूर्ती सजलेल्या स्टॉलला भेटी दिल्या. वाहतूक खर्चात झालेली वाढ तसेच माती, रंग, मजुरीचा खर्च वाढल्याने गणेश मूर्तींचे दर ४० टक्क्यांवर पोहचले आहेत. घरगुती मूर्तींची किंमत पाचशे रुपयांपासून पंधरा हजार रुपयांपर्यंत आहे. गणेश भक्तांकडून पर्यावरण पूरक मूर्तींना प्रचंड मागणी आहे, असे - मधुसूदन शेवकरी, गणेश मूर्ती विक्रेते, चाकण यांनी सांगितले.



# पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात इच्छुकांची गर्दी



■ जेजुरी (दै. संध्या)

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठी आमदार होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या इच्छुकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, अनेक अपक्ष शिक्षकदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. मात्र, सध्याच्या शिक्षकांमधील चर्चेनुसार विद्यमान आमदार जयंत आसगावकर, माजी आमदार दत्तात्रय सावंत आणि महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव नंदकुमार सागर सर या तीन मातब्बर उमेदवारांमध्येच खरी लढत रंगण्याचे भाकीत व्यक्त केले जात आहे.

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे कार्यक्षेत्र मोठे असून, पुणे शहर व ग्रामीण भागासह सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांतील शिक्षकांना मतदानाचा अधिकार आहे. त्यामुळे या मतदारसंघाची निवडणूक केवळ पुणे जिल्ह्यापुरती मर्यादित नसून, पाचही जिल्ह्यांतील शिक्षकांच्या प्रश्नांना योग्य न्याय देणारा प्रतिनिधी कोण असावा, यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून राहणार आहे. विद्यमान आमदार जयंत आसगावकर हे काँग्रेसप्रणित विकास आघाडीचे उमेदवार म्हणून पुन्हा मैदानात आहेत. शिक्षक कृती समितीचे माजी आमदार दत्तात्रय सावंत हेदेखील उमेदवारीच्या रिंगणात असल्याने त्यांचीही भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव नंदकुमार सागर सर यांच्या संभाव्य उमेदवारीने निवडणुकीच्या चर्चेला वेगळे वळण मिळाले आहे. शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणारे, आंदोलनांच्या माध्यमातून प्रश्न मांडणारे आणि कोणतेही सत्तापद नसतानाही शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सक्रिय राहणारे नेतृत्व म्हणून सागर सरांकडे शिक्षकवर्गाचे लक्ष वेधले जात आहे.

नंदकुमार सागर सरांची भूमिका पुणे जिल्ह्यापुरती मर्यादित नसून, पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांतील शिक्षकांचे प्रश्न समान ताकदीने मांडण्याची आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या सर्व जिल्ह्यांतील शिक्षकांना समान न्याय देणारा प्रतिनिधी असावा, असा त्यांचा दृष्टिकोन असल्याचे त्यांच्या भूमिकेतून दिसून येते.

माध्यमिक शिक्षक, विनाअनुदानित शिक्षक, इंग्रजी माध्यमातील शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक अशा विविध शिक्षक घटकांचे मतदान या मतदारसंघात होते. त्यामुळे प्रत्येक शिक्षक घटकाचा प्रश्न समजून घेऊन त्यासाठी सातत्याने उपलब्ध राहणारे नेतृत्व कोणते, यावर यंदाची निवडणूक अधिक केंद्रित होण्याची शक्यता आहे. गेल्या दहा-बारा वर्षांच्या कालखंडाचा विचार करता शिक्षकांच्या अनेक प्रश्नांवर निवेदने, आंदोलने आणि आश्वासने झाली; मात्र अनेक प्रश्नांची अपेक्षित गतीने अंमलबजावणी झालेली नसल्याची भावना शिक्षकांमध्ये आहे. शिक्षण विभागातील छोटी-मोठी कामे, प्रशासकीय प्रश्न आणि विविध प्रलंबित बाबींसाठी शिक्षकांना वारंवार कार्यालयीन हेलपाटे मारावे लागत असल्याची चर्चा आहे.जुनी पेन्शन योजना हा देखील शिक्षकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पेन्शनच्या प्रश्नावर न्यायालयीन निर्णय आणि विविध स्तरांवर पाठपुरावा होऊनही शासनस्तरावर अंतिम अंमलबजावणीचा प्रश्न कायम असल्याने हा मुद्दा आगामी निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. शिक्षकांमध्ये आता केवळ निवडणुकीपुरती आश्वासने देणाऱ्या नेतृत्वापेक्षा प्रश्नांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेण्यासाठी शासन आणि प्रशासनावर प्रभावी दबाव निर्माण करणारा आमदार हवा, अशी भावना व्यक्त होत आहे.

### तीन मातब्बर उमेदवारांमध्ये मुख्य लढतीचे शिक्षकांमधून भाकीत

### अनेक अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरणार

दरम्यान, आगामी निवडणुकीत विविध शिक्षक संघटना, आघाड्या तसेच अनेक अपक्ष शिक्षक उमेदवारही आमदारकीसाठी रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतविभाजनाचे समीकरण निर्माण होऊ शकते. मात्र, सध्याच्या शिक्षकांमधील चर्चेचा कल पाहता अनेक उमेदवार मैदानात असले तरी जयंत आसगावकर, दत्तात्रय सावंत आणि नंदकुमार सागर या तीन प्रमुख नावांभोवतीच मुख्य राजकीय व शिक्षकवर्गीय लढत केंद्रित होण्याचे भाकीत व्यक्त केले जात आहे. शिक्षकांचा कोणताही प्रश्न असो, त्याची तातडीने दखल घेणे, संबंधित विभागाकडे पाठपुरावा करणे आणि प्रश्न सुटेपर्यंत त्याचा पाठपुरावा सुरू ठेवणे, अशी कार्यपद्धती शिक्षकांना अपेक्षित आहे. शिक्षकांसाठी 'जनता दरबार', थेट संवाद आणि प्रश्नांची तातडीने दखल घेण्याची भूमिका नंदकुमार सागर सरांकडून मांडली जात असल्याने त्यांच्या संभाव्य उमेदवारीकडे शिक्षकवर्गाचे विशेष लक्ष लागले आहे. त्यामुळे आगामी निवडणूक ही केवळ आमदारकीची निवडणूक न राहता 'शिक्षकांचा खरा आवाज कोण?' याचा फैसला करणारी निवडणूक ठरण्याची शक्यता आहे. अनेक अपक्ष उमेदवार मैदानात असले तरी सध्याच्या शिक्षकांच्या चर्चेनुसार तीन मातब्बर शिक्षक नेत्यांमध्ये खरी लढत रंगणार, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. या तिरंगी लढतीत शिक्षकांचा कौल कोणाच्या बाजूने झुकतो, याकडे संपूर्ण पुणे विभागाचे लक्ष लागले आहे.

# श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने 268 विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

■ जेजुरी(दै. संध्या)

श्री मार्तंड देवस्थान जेजुरी यांच्या वतीने देवस्थानचे विश्वस्त अॅड पांडुरंग थोरवे व कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टच्या उपाध्यक्षा वर्षा थोरवे यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंभारकरवाडी,दवणेमळा ,रनवरेवाडी, मावडी, चोरवाडी, जवळार्जुन, चौरेवाडी ,बहिर्जीचीवाडी, यादववाडी मोरुजीचीवाडी बोरमाळ, माळवाडी या शाळातील 268 विद्यार्थ्यांना दप्तर व वह्यांचे वाटप करण्यात आले .

कुंभारकर वाडी जिल्हा परिषद शाळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी पुणे जिल्हा परिषदेच्या विद्यमान सदस्या डॉ. कुमारी प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे, वागदरवाडीचे सरपंच सुनील पवार , वाल्हे उपसरपंच सागर भुजबळ,जवळार्जुनचे सरपंच सोमनाथ कणसे,मुख्याध्यापक श्रगृंधर कुंभार,शाळा व्यवस्थापन समिती कुंभारकरवाडी चे अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य पालक,सर्व शाळांचे शिक्षक उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या म्हेत्रे तर आभार सचिन सातभाई यांनी मानले.



# मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाची तातडीने दखल घ्या!

■ शिरूर (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील गेल्या बारा दिवसांपासून उपोषणाला बसले असून, त्यांच्या प्रकृतीची दिवसेंदिवस चिंता वाढत आहे. शासनाने आता अधिक वेळकाढूपणा न करता मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने शिरूर तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. दरम्यान, जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी शिरूर शहरातील जुन्या पुणे-अहिल्यानगर महामार्गावर सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

यावेळी नायब तहसीलदार स्नेहल गिरगोसावी व पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांना निवेदन देण्यात आले. जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जरांगे-पाटील यांच्या जीवाला कोणताही धोका निर्माण झाल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते.

# रानभाज्या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद २३ महिला स्वयंसहाय्यता गटांचा सहभाग

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

"महिला संघटित झाल्या की शक्ती निर्माण होते. या शक्तीला कौशल्याची जोड मिळाली की उद्योजकता निर्माण होते आणि उद्योजकतेला योग्य बाजारपेठ मिळाली की आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला होतो," या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत राजगुरुनगर येथे रानभाज्या महोत्सव २०२६ उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व पंचायत समिती खेड यांच्या अंतर्गत आयोजित या महोत्सवात तालुक्यातील २३ महिला स्वयंसहाय्यता गटांनी सहभाग घेतला. या गटांनी तयार केलेल्या विविध पारंपरिक खाद्यपदार्थ, रानभाज्या, कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले पदार्थ तसेच महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे विक्री व प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले.



महिलांच्या पारंपरिक ज्ञानाला, स्थानिक रानभाज्यांची ओळख, पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि उत्पादन कौशल्याला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. 'स्थानिक उत्पादन–स्थानिक बाजारपेठ–महिला उद्योजकता' या संकल्पनेला चालना देणारा हा उपक्रम ठरला.

महोत्सवात रानभाज्या, चिचुर्डी, चैत्याची भाजी, कोकम कढी, वानवडी, भारंगी, कुर्डूची भाजी, आवळ्याचे लोणचे, शिगुळी, कुरडया, पापड्या, मुगभजी, पुरणपोळी, तूप, मसाले, देशी बियाणे, विविध प्रकारचे धान्य, इडली, मासवडी, पीठ, हेल्दी बिस्किटे, गव्हाचे चॉकलेट, तीळाची चटणी, पालक पापड, ज्यूट बॅग, नैसर्गिक अन्यधान्य, ओट्स, नाचणी आदी उत्पादनांचे स्टॉल्स लावण्यात आले होते.

महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विशाल शिंदे, सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्य तनुजा घनवट, दीप्ती भोगाडे, पंचायत समिती सदस्य माऊली ढेरंगे, शंकर कावडे, सारिका गोगावले, श्रद्धा मांडेकर, अश्विनी तरस, दिलीप डुबे, कविता राक्षे, रुपाली कांबळे, गौरी मुन्हे आदी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील गरीब व गरजू कुटुंबातील महिलांना संघटित करून त्यांचे सामाजिक, आर्थिक व उपजीविकेच्या माध्यमातून सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यरत आहे.

स्वयंसहाय्यता समूहांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी प्रदर्शन, विक्री केंद्रे, मेळावे व महोत्सवांचे आयोजन केले जाते. या माध्यमातून ग्रामीण महिला बचत गट सदस्या, उद्योजिका, पशुसखी, बँक सखी, ग्रामसखी तसेच 'लखपती दीदी' अशा विविध भूमिकांमधून सक्षम होत असल्याचे यावेळी दिसून आले.

# कोंढवा नशामुक्त करण्यासाठी भव्य जनजागृती रॅली

■ पुणे(दै. संध्या)

कोंढवा प्रभाग क्रमांक-19 मध्ये नगरसेवक अँड.हाजी गफुर पठाण यांच्या वतीने नशामुक्तीसाठी भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.कोंढवा भागातील बहुतांश युवक नशेचे आहारी जात असताना कोंढवा पोलीस स्टेशनच्या वतीने नशेचे साहित्य विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आले होते.या कारवाईचे समर्थन करण्यासाठी सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भविष्यात होणाऱ्या कारवाईसाठी आम्ही सर्व कोंढवावासीं कोंढवा पोलीस स्टेशन व वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. संतोष खेतमाळस यांच्या सोबत आहोत असे यावेळी नगरसेवक गफुर पठाण यांनी सांगितले.यामध्ये कोंढवा भागातील सर्व शाळेचे विद्यार्थी,शिक्षक,मुख्याध्यापक, मौलाना आणि उलेमा व स्थानिक नागरिक बहुसंख्येने सहभागी झाले होते.




## शिवतेज नगर, श्री स्वामी समर्थ मंदिर येथे नागपंचमी उत्साहात

■ पिंपरी (दै. संध्या)

हिंदू धर्मातील सर्व सण निसर्ग आणि पर्यावरणाशी संबंधित आहेत. त्यातीलच एक श्रावण महिन्यातील मुख्य सण म्हणजे नागपंचमी. नागाला शेतकऱ्यांचा मित्र म्हणून संबोधले जाते. यावर्षीची नागपंचमी श्रावणातील पहिल्या सोमवारी आल्यामुळे हा एक दुग्ध शर्करा योग आहे. शिवतेज नगर मधील श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान आणि ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे यांनी महिलांसाठी नागपंचमी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रत्येकीला माहेरी आल्याची भावना निर्माण होत आहे मत नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी महिलांना नागपंचमीनिमित्त शुभेच्छा देताना व्यक्त केले.

शिवतेज नगर, चिंचवड येथील घरकुल चौकाजवळ श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्रावण मास निमित्त नागपंचमी उत्सव आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो महिलांनी नाग प्रतिमेचे पूजन केले. तसेच पारंपरिक पद्धतीचा झिम्मा, फुगडी, फेर आणि नृत्य सादर करून झोके खेळण्याचा देखील आनंद घेतला. येथे नारायण बहिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली



वर्षभर सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रम साजरे केले जातात. नागपंचमी हा महिलांचा सण, निसर्गातील प्रत्येक प्राण्या विषयी आदर व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला होतो. पंचमीला यापूर्वी महिला आठवडाभर आधी माहेरी जात असत. विविध खेळ कार्यक्रम करत करायच्या असे महिला कार्याध्यक्ष सारिका रिकामे यांनी सांगितले नागाची प्रतिमा आणि कृत्रिम वारूळ तयार करून याची पूजा करण्यात आली आहे. दूध, पाणी, नारळ यामुळे नागांची हानी होऊ नये म्हणून येथे कृत्रिम वारूळ तयार केले आहे. नाग पंचमी महिलांसाठी जिव्हाळ्याचा सण आहे असे महिला उपाध्यक्ष अंजली देव यांनी सांगितले. नागपंचमीचा सण साजरा करण्यामागे एक पौराणिक कथा आहे की श्रीकृष्ण जेव्हा गोकुळात होते तेव्हा कालिया नागाने यमुना नदीत खूप थैमान मानले होते. श्रीकृष्णाने याच दिवशी कालिया नागाचे मर्दन केले म्हणून नागपंचमी साजरी केली जाते असे कार्याध्यक्ष छाया महाजन यांनी सांगितले. तसेच ज्येष्ठ महिला शांताबाई वायाळ, मंगल काळे यांनी पारंपरिक गाणी गायली. यावेळी ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायणराव बहिरवाडे, स्मिता शिरसाट, अश्विनी केवाडकर, रेश्मा माधव आणि हरि नारायण शेळके आदी उपस्थित होते.

## निधी वाटपात भेदभाव; खासदार डॉ.अमोल कोल्हेंचा सवाल

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील गुंजाळवाडी येथे धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या नूतन शाखेचे उद्घाटन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमादरम्यान बोलताना त्यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला.

खासदार कोल्हे म्हणाले की, खासदार देखील जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी असतात, याचा महाराष्ट्र सरकारला विसर पडला आहे का?जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपातून खासदारांना पद्धतशीरपणे वगळले जात असून राजकीय मनमानी कारभार सुरू आहे. डॉ. अमोल कोल्हे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपाचे आकडे मांडत सरकारवर दुजाभाव केल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या मते, सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यासाठी मंजूर निधीपैकी ७० टक्के निधी आमदारांच्या शिफारशीनुसार आणि ३० टक्के निधी पालकमंत्र्यांच्या अखत्यारीत देण्याचा फॉर्म्युला ठरवण्यात आला आहे, त्यामुळे खासदारांच्या अधिकारांवर गदा येत असल्याचे त्यांनी सांगितले. संपूर्ण निधी जर आमदार आणि पालकमंत्र्यांमध्येच वाटला जाणार असेल, तर मतदारसंघातील जनतेने खासदारांकडे दिलेली विकासकामांची निवेदने आम्ही रद्दीत टाकायची का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. खासदारांनी केवळ पाहत बसायचे आणि जनतेला उत्तर काय द्यायचे, अशी विचारणा त्यांनी या वेळी केली. या कार्यक्रमाला आमदार शरद सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पक्षाचे तालुकाध्यक्ष तुषार थोरात, संस्थेचे अध्यक्ष प्रवीण डेरे, उपाध्यक्ष मेहबूब काझी, जिल्हा सदस्य गुलाब पारखे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष विकास दरेकर, ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष सुजित खैरे, गुंजाळवाडी सरपंच दिव्या सोलाट, उपसरपंच विघ्नहर सोलाट, भाजपा नेते संतोष खैरे,पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अमित बेनके, राजेश कोल्हे उपस्थित होते.

## मॉर्निंग वॉकला गेलेल्या महिलेचे मंगळसूत्र हिसकावले; पडल्याने मनगट फ्रॅक्चर

■ नारायणगाव (दै. संध्या)

मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मणी असलेले मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी पाठीमागून हिसकावून नेले. मंगळसूत्र हिसकावताना झालेल्या धक्क्यामुळे महिला रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या उजव्या हाताच्या मनगटाला फ्रॅक्चर झाले असून चेहरा, हात-पायालाही दुखापत झाली आहे.

ही घटना नारायणगाव येथील नारायणवाडी रोडवर घडली. ८ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पुष्पलता भोर या नारायणवाडी रोडवरून चालत जात होत्या. त्यावेळी येवला पैठणी दुकानासमोर काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्या पाठीमागून आले. त्यांनी पुष्पलता भोर यांच्या गळ्यातील सोन्याचे मणी असलेले मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावले आणि दुचाकीवरून पसार झाले.

अचानक झालेल्या या प्रकारात जोराचा




धक्का बसल्याने पुष्पलता भोर डांबरी रस्त्यावर पडल्या. त्यात त्यांच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूस, कपाळावर, तोंडाला व दातांना तसेच उजव्या गुडघ्याला दुखापत झाली. त्यांच्या उजव्या हाताच्या मनगटालाही फ्रॅक्चर झाले आहे. हिसकावून नेलेल्या सोन्याच्या मंगळसूत्राची किंमत १ लाख २० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी संतोष निवृत्ती भोर यांनी नारायणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (६), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पाटील करीत आहेत.

## कर्जमाफी झाली नियमित कर्जदारांच्या ५० हजार प्रोत्साहनपर अनुदानाची प्रतीक्षा कायम

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)

शेतकऱ्यांचे लक्ष शासनाच्या निर्णयाकडे नियमित कर्जफेड करणाऱ्यांना लवकर लाभ देण्याची मागणी. महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ लागू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून, नियमितपणे पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीही प्रोत्साहनपर लाभ म्हणून कमाल ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, कर्जाची परतफेड वेळेत करून शासनाच्या योजनेला पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना या प्रोत्साहनपर रकमेची प्रत्यक्षात प्रतीक्षा करावी लागत असल्याने ग्रामीण भागात नाराजी व्यक्त होत आहे. ज्यांनी कर्ज घेतले आणि ते वेळेत फेडले, अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण स्वागतार्ह असले, तरी त्याची अंमलबजावणी वेगाने व्हावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन का? शेतकरी आर्थिक अडचणी, नैसर्गिक संकटे, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील चढ-उतार यांचा सामना करत असतानाही काही शेतकरी आपले पीककर्ज वेळेत फेडतात. अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि नियमित कर्जफेडीची सवय वाढवणे हा या तरतुदीमागील महत्त्वाचा उद्देश आहे.

नवीन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र नियमित कर्जदार शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद आहे. काही परिस्थितींमध्ये प्रत्यक्ष परतफेड केलेल्या कर्जाच्या रकमेचे निकषही लागू आहेत. तसेच पुढील कालावधीतील पीककर्जाची वेळेत परतफेड करणे योजनेच्या पात्रतेशी संबंधित आहे. शेतकऱ्यांची शासनाकडे अपेक्षा

कर्जमाफीचा लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांप्रमाणेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर रक्कम वेळेत मिळणे आवश्यक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. नियमित कर्जफेड करूनही अनुदानासाठी प्रतीक्षा करावी लागत असेल, तर प्रामाणिकपणे कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे, अशी भावना ग्रामीण भागात व्यक्त होत आहे. शासनाने पात्र लाभार्थ्यांची प्रक्रिया, कागदपत्रांची पडताळणी आणि बँक खात्याशी संबंधित बाबी जलदगतीने पूर्ण करून ५० हजारांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, अशी मागणी होत आहे. शेतकऱ्यांना आता अंतिम निर्णयाची प्रतीक्षा शासनाने कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. कर्जबाजारी शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळत असताना नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

## राहुल नार्वेकर यांच्या हस्ते कामगारनेते यशवंत भोसले यांचा विशेष सन्मान!

■ पिंपरी (दै. संध्या)

कामगार आणि श्रमिकांच्या हक्कासाठी गेल्या ३५ वर्षांपासून सातत्याने संघर्ष करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांचा मराठी पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर यांच्या हस्ते (दि.८) स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी सोहळ्यात संघटनेच्या सभासदांनी व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या जल्लोषात आनंद व्यक्त केला.

मराठी पत्रकार संघाच्या वतीने ऑटो क्लस्टर सभागृहामध्ये एका विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात




आणि दिमाखात संपन्न झाला.पद्मश्री गिरीशजी प्रभुणे,विधान परिषदेचे आमदार श्री अमितजी गोरखे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ.विजयजी सूर्यवंशी, दैनिक लोकमतचे संपादक संजयजी आवटे यांनी कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांच्या कार्याचे कौतुक केले व पत्रकार संघाने योग्य निवड या सन्मानासाठी केली याकरिता समाधान व्यक्त केले.कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ कष्टकरी, कामगार आणि श्रमिकांच्या हक्कासाठी, न्याय्य मागण्यांसाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत लढाऊ व निस्वार्थपणे काम केले आहे. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी राज्यभरातील कामगार वर्गात एक हक्काचा आणि विश्वासाचा चेहरा म्हणून ओळख निर्माण केली असून कामगार आणि कंपन्यांमधील व्यवस्थापनामध्ये समन्वय साधत असतानाच, कर्मचाऱ्यांना त्यांचे कायदेशीर हक्क, योग्य वेतन आणि योग्य न्याय कायदेशीर मार्गाने मिळवून दिला आहे. कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी सातत्याने घेतलेले श्रम आणि विविध पातळ्यांवर दिलेला लढा हा कामगार चळवळीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्यांच्या याच निष्ठावान आणि कर्तृत्ववान सामाजिक कार्याचा गौरव म्हणून मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. कामगार चळवळीला नवी दिशा देणारे आणि तळागाळातील घटकांना न्याय मिळवून देणारे एक अभ्यासू व आक्रमक नेते म्हणून त्यांची महाराष्ट्रभर ओळख आहे.हा बहुमोल पुरस्कार आयुष्यातील अत्यंत आठवणीत राहणारा आणि प्रदीर्घ संघर्षाची पावती देणारा क्षण असल्याची भावना कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी यावेळी व्यक्त केली.तसेच, राजकीय संपादिका (मुंबई) श्रीमती मृणालिनी नानिवडेकर, दै. पुढारीचे संपादक श्री. सुनीलजी माळी, न्यूज १८ मराठी मुंबईचे सहसंपादक श्री. विशालजी परदेशी, सकाळ पुणेचे ज्येष्ठ पत्रकार श्री. राज काची, आणि लेटसअप पुणेचे संपादक श्री. योगेशजी कुटे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विधानसभा अध्यक्ष मा. श्री. राहुलजी नार्वेकर यांची 'आमदारांचे हेडमास्टर' या विषयावर विविध मुद्द्यांवर प्रकट मुलाखत घेतली, ज्याला उपस्थितांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विधानसभा अध्यक्ष मा.श्री राहुल जी नार्वेकर, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ विजयजी सूर्यवंशी, एस एम बी पी स्कूल चे चेअरमन डॉक्टर डी के भोसले, ऑटो संघटनेचे अध्यक्ष श्री बाबा कांबळे, दान से उडान चे संस्थापक श्री रवी घाटे, आवटी ग्रुप चे चेअरमन श्री बाबासाहेब आवटी यांचाही विशेष सन्मान देऊन यावेळी गौरवण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### गुंजाळवाडीत शिवणकला प्रशिक्षणाचा उत्साहात शुभारंभ

**नारायणगाव : दैनिक संध्या**

डिसेंट फाउंडेशन, पुणे आणि हायस्पीड स्किल हब, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने, सौ. सुरेखा पांडुरंग तोडकर व ग्रामपंचायत गुंजाळवाडी यांच्या विशेष सौजन्याने व सहकार्याने गरजू महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ४० दिवसीय मोफत 'शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा' शुभारंभ मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी गुंजाळवाडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन स्वावलंबी, सक्षम व आत्मनिर्भर बनविणे, तसेच ग्रामीण भागातील महिलांना गावातच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी सांगितले. यावेळी बोलताना जुन्नर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विकास दरेकर म्हणाले की, "डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, कृषी आणि आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विविध उपक्रम राबविले जात आहेत. समाजातील सर्व घटकांतील गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचून त्यांना मदत व संधी उपलब्ध करून देण्याचे संस्थेचे कार्य कौतुकास्पद आहे." या ४० दिवसीय प्रशिक्षणामध्ये सहभागी महिलांना मोफत शिवणकला प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सहभागी महिलांना प्रशिक्षण प्रमाणपत्र तसेच उद्यम आधार कार्ड देण्यात येणार असून, त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे महिलांना कौशल्याच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी मिळणार आहे. या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ. एफ. बी. आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, सरपंच दिव्या सोलाट, माजी सरपंच रेश्मा वायकर, सुरेखा तोडकर, पांडुरंग तोडकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमित चव्हाण, जयशिंग वायकर, गणेश मेहेर, रमेश ढवळे, प्रशिक्षक छाया पाटील, मुख्याध्यापिका प्रतिभा कदम, ग्रामपंचायत सदस्या पूजा सोलाट व स्वाती शिंदे यांच्यासह ग्रामस्थ आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### जुन्नरमध्ये खंडणी प्रकरणाने राजकीय वर्तुळात खळबळ

**नारायणगाव : दैनिक संध्या**

कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची धमकी देत व्यवस्थापकाकडून चार लाख रुपये रोख घेतल्याच्या आरोपावरून जुन्नर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये दोन नगरसेवकांसह दोन नगरसेविकांच्या पतींचा समावेश असल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे जुन्नरच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. मुंबई येथील व्यवस्थापक मुकुंद रत्नाकर डोंगरे (वय ५२) यांनी याबाबत पोलिसांत रीतसर फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून प्रशांत सराईकर, वाजीद इनामदार, गणेश पातुरकर आणि सोहेल शेख यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०८(२), ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा रजिस्टर क्रमांक २८७/२०२६ असा आहे. या प्रकरणात केवळ हे चारच जण आहेत की आणखी काही लोकप्रतिनिधींचा सहभाग आहे, या दृष्टीनेही पोलिसांचा तपास सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, आणखी चार नगरसेवकांचा या खंडणी प्रकरणात थेट अथवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचा संशय असून, पोलीस सध्या त्या दिशेने चौकशी करत आहे.

### महामार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई

**नारायणगाव : दैनिक संध्या**

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी आणि प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी प्रशासनाने एक मोठे पाऊल उचलले आहे. खेड ते आळेफाटा दरम्यान महामार्गाच्या कडेला झालेल्या सर्व अतिक्रमणांवर आजपासून पोलीस बंदोबस्तात तीव्र कारवाई करण्यात येणार आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभागाकडून संबंधित अतिक्रमणधारकांना अधिकृत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.पुढील सात दिवसांत अतिक्रमणधारकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा पोलीस बंदोबस्तात ती पाडली जातील, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, भोसरी ते खेड या भागात आज, गुरुवारपासूनच अतिक्रमण विरोधी कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग विभागाचे तांत्रिक सल्लागार दिलीप शिंदे यांनी दिली. नाशिक फाटा ते खेड दरम्यान महामार्गाच्या मध्यापासून दोन्ही बाजूंना २० ते २२ मीटर अंतरावरील अतिक्रमणे काढली जाणार आहे.

### ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी चालक-मालकांनी कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा



**बारामती : दैनिक संध्या**

ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी चालक-मालकांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक-मालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बारामतीचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी केले आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र चालक-मालकांनी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन सभासद नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी अनुज्ञप्ती, बॅज,परवाना, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड आदी आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. मंडळामार्फत वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेल्या चालकांसाठी सन्मान निधी योजना, कर्तव्यावर असताना जीवन विमा व अपघात विमा योजना, आरोग्यविषयक लाभ योजना, कामगार कौशल्यवृद्धी योजना, कर्तव्यावर असताना दुर्दैवी मृत्यू झाल्यास अर्थसहाय्य योजना तसेच सभासदांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र चालक मालकांनी मडंळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन सभासद नोंदणी करावी. ६५ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र सभासदांना सन्मान निधी योजनेंतर्गत ₹१० हजारांचा लाभ देण्यात येणार आहे. ३ सप्टेंबर रोजी गडकरी रंगायतन, ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात पात्र चालक-मालकांना सन्मान निधीचे धनादेश वितरित करण्यात आले. बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी चालक-मालकांनी ऑनलाइन सभासद नोंदणी करुन योजनांचा लाभ घ्यावा, असे कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### आदिवासी शेतकऱ्यांसाठी स्ट्रॉबेरी लागवड व शेततळे योजनेचा लाभ

**पुणे : दैनिक संध्या**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांसाठी स्ट्रॉबेरी प्राथमिक लागवड किट, अस्तरीकरणासह नवीन शेततळे निर्मिती तसेच अस्तित्वात असलेल्या शेततळ्याचे अस्तरीकरण या घटकांसाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आंबेगाव, जुन्नर, राजगुरुनगर, मावळ तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी १७ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. योजनेअंतर्गत स्ट्रॉबेरी लागवड किटसाठी ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तसेच अस्तरीकरणासह नवीन शेततळे निर्मिती आणि अस्तित्वात असलेल्या शेततळ्याचे अस्तरीकरण या घटकांसाठीही शासनाच्या निर्धारित मापदंडानुसार अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा आदिवासी शेतकरी असणे आवश्यक असून, यापूर्वी स्ट्रॉबेरी लागवडीसाठी इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेला नसावा. योजनेतील इतर घटकांचा लाभ घेण्यासाठी स्ट्रॉबेरी प्राथमिक लागवड हा घटक अनिवार्य आहे. स्ट्रॉबेरी लागवडीसोबत अस्तरीकरणासह नवीन शेततळे निर्मिती किंवा अस्तित्वात असलेल्या शेततळ्याचे अस्तरीकरण यापैकी एका घटकाचा लाभ घेता येणार आहे. लाभार्थी निवडीनंतर संबंधित कामे तांत्रिक निकषांनुसार विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. मंजूर मापदंडापेक्षा अधिक होणारा खर्च लाभार्थ्याने स्वतः करावयाचा आहे. अर्जासाठी ७/१२ उतारा, ८-अ उतारा, आधार कार्ड, जात प्रमाणपत्र/दाखला, बँक पासबुकची झेरॉक्स आणि हमीपत्र आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी कार्यालयामार्फत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मतदार यादीत प्रत्येक पात्र मतदाराच्या समावेशासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे

**पुणे : दैनिक संध्या**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दुसऱ्या टप्प्यातील प्रक्रियेला सुरुवात झाली असून प्रारूप मतदार यादीवर प्राप्त झालेल्या दावे व हरकती वर सुनावण्या घेण्यात येणार आहेत. प्रत्येक पात्र नागरिकाचा समावेश अंतिम मतदार यादीत होईल यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे असे आवाहन मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त शीतल तेली- उगले यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत राजकीय पक्षाच्या प्रतिनिधी सोबत आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी आमदार बापूसाहेब पठारे, बैठकीस अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, रोहयो सहआयुक्त तथा नोडल अधिकारी संजीव पलांडे, पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी ओमप्रकाश दिवटे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी विक्रांत बगाडे, उपजिल्हाधिकारी मीनल कळसकर तसेच विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. श्रीमती तेली म्हणाल्या, विशेष मतदार यादी पुनरिक्षणासाठी विभागीय आयुक्त यांची ‘मतदार यादी निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत विभागातील प्रत्येक जिल्ह्याला तीन भेटी देण्यात येणार आहेत. ही संपूर्ण प्रक्रिया मतदार केंद्रित असणार आहे. या प्रक्रियेत राजकीय पक्षांचे प्रतिनिधी प्रशासनासोबत काम करत आहेत. मतदार यादीतील मयत, स्थलांतरित, दुबार नावे वर्षानुवर्षे तसेच राहतात. या कार्यक्रमांतर्गत सर्वंकष मतदार यादी तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे एकही पात्र मतदार यादीतून वगळला जाणार नाही व भारतीय नसलेला अपात्र मतदार यादीत समाविष्ट होणार नाही यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. एसआयआर पूर्वी असलेल्या ९० लाख ८० हजार मतदारांपैकी सुमारे २८ लाख मतदार एएसडीडी यादीमध्ये समाविष्ट झाली आहेत. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात ४ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. प्रारूप मतदार यादीतील नाव, पत्ता, छायाचित्र याबाबत विसंगती असल्यास मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडून ॲप द्वारे दुरुस्त करुन घ्यावी. राजकीय पक्षांनी मतदारांना सुनावणीवेळी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याबाबत आवाहन करावे. मतदारांच्या सोयीच्या ठिकाणी सुनावणी घेण्यासाठी क्षेत्र निवडावे. राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी प्रारूप मतदार यादी तपासून घ्याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

### फास सुटणार; हद्दवाढ होणार

**कोल्हापूर: दैनिक संध्या**

कित्येक दशके स्वार्थी राजकारणात अडकलेल्या कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीला मुहूर्त मिळण्याची शक्यता आहे. शहराचा श्वास कोंडून राजकीय जहागीरदारी चालवणाऱ्यांच्या मनसुब्यांवर पाणी फेरत, राज्य शासनाने कोल्हापूर महापालिकेच्या हद्दीत थेट आठ गावे समाविष्ट करण्याच्या हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत. महापालिकेने पाठवलेल्या अहवालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला संपूर्ण पाठबळ दर्शवत हद्दवाढीतील सर्व अडचणी मुळासकट उपटून काढण्याची खात्री दिली आहे. परिणामी, हद्दवाढीला लवकरच ‘ग्रीन सिग्नल ’ मिळणार हे आता निश्चित झाले आहे. हद्दवाढ म्हणजे गावांवर अन्याय, असा कांगावा करत सत्ता टिकवू पाहणाऱ्या गावपुढाऱ्यांचे बुरखे महापालिकेच्या सवलतींच्या पॅकेजमुळे फाटले जाणार आहेत. हद्दवाढ झाली तरी गावांवर कोणताही कराचा बोजा अचानक लादला जाणार नाही, हे शासनाने आधीच स्पष्ट केले आहे. पहिल्या वर्षी संपूर्ण मालमत्ता कर माफ असेल. दुसऱ्या वर्षापासून अवघा २० टक्के कर लागू करून पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने १०० टक्क्यांपर्यंत सवलतीचे नियोजन केले आहे. संबंधित ग्रामपंचायतींच्या कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत थेट सामावून घेतले जाणार असून आवश्यकतेनुसार नव्या पदभरतीलाही हिरवा कंदील दाखवला जाईल. गावांतील जिल्हा परिषदेच्या शाळा जिल्हा परिषदेकडेच राहतील; त्यांनी नकार दिला तरच महापालिका त्यांचा ताबा घेईल. पिण्याच्या पाण्याच्या सध्याच्या कोट्यात कोणताही खंड पडणार नाही.

### प्रसूती काळात पाच वर्षांत दगावल्या २७१ माता

**पुणे : दैनिक संध्या**

प्रसूती म्हणजे एका नव्या जीवाला जन्म देणे. या काळात महिलांचा एक प्रकारे पुनर्जन्मच होतो. शासकीयसह खासगी रुग्णालयांमध्ये प्रसूतीच्या काळात मातांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जात असतानाही दरवर्षी माता मृत्यू होण्याच्या घटना कायम आहेत. कोल्हापूर विभागात २०२२ ते २०२६ या पाच वर्षांत प्रसूती काळात एकूण २७१ माता दगावल्या आहेत. गर्भवतींना आरोग्य विभागाकडून दिल्या जाणाऱ्या सूचना आशा वर्कर्स देत असतात, तरीदेखील अजूनही माता मृत्यूचे प्रमाण रोखण्यात अपयश आले आहे. माता मृत्यू होण्याचे प्रमाण ग्रामीणसह शहरी भागातही आहे. आरोग्य विभागाच्या पाहणीत ग्रामीण व शहरी भागातील माता मृत्यू होण्याची कारणे वेगवेगळी आहेत. उच्च शिक्षण, लग्नासाठी वाढते वय यामुळे शहरामध्ये मुलींमध्ये गर्भधारणेपासून ते प्रसूती काळापर्यंत समस्या दिसून येतात. शारीरिक कष्ट, गरोदरपणात आहाराकडे दुर्लक्ष, कमी अंतराने राहणारी गर्भधारणा यामुळे ग्रामीण भागातील प्रसूती काळात धोका निर्माण होत आहे. गर्भावस्थेदरम्यान लोह, फॉलिक ॲसिड, कॅल्शियम योग्य प्रमाणात आहारातून घेणे, दर तीन महिन्यांनी सोनोग्राफी करणे, गर्भवती काळात होणाऱ्या रक्तस्रावाकडे दुर्लक्ष करू नये, अतिशारीरिक कष्टाची कामे टाळणे गरजेचे आहे. माता मृत्यूसाठी सध्या महत्वाचे कारण म्हणजे प्रसूतीपूर्व उच्च रक्तदाब, अतिरक्तस्राव, जंतुसंसर्ग आणि रक्तक्षय ही कारणे आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अनुसूचित जाती-जमातीतील महिलांना प्रसूतीनंतर आर्थिक मदत देणारी जननी सुरक्षा योजना, जननी शिशू सुरक्षा योजना, गर्भवती काळातील तपासणी, प्रसूतीपूर्व सेवा, समुपदेशन, जोखमीनुसार चाचणी यासाठी प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान सुरू आहे.

## गुंजाळवाडी येथे धर्मवीर संभाजी नागरी पतसंस्थेच्या तिसऱ्या शाखेचे उद्घाटन

■ नारायणगाव (दै. संध्या)

संपूर्ण पुणे जिल्ह्यात सहकार क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या व सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये भाग घेणाऱ्या तसेच १०० कोटी ठेवींकडे वाटचाल करणाऱ्या नारायणगाव येथे मुख्य शाखा असलेल्या धर्मवीर नागरी सहकारी पतसंस्थेचे तिसऱ्या शाखेचे उद्घाटन गुंजाळवाडी येथे संस्थेचे सभासद असलेले शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार संसदरत्न डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.



या संस्थेची नारायणगाव येथे मुख्य शाखा, दुसरी शाखा वारूळवाडी तर तिसरी शाखा गुंजाळवाडी येथे असून संस्थेने वाडीवस्तीवर शाखा स्थापन करून सर्व सामान्य व शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जात आहे.स्व. ग्रामसेवक गुलाबराव डेरे, स्व.निवृत्त ग्रामसेवक वसंतराव देशमुख आणि शंकरराव कोल्हे या सहकार्यांच्या सहकार्याने सत्तावीस वर्षांपूर्वी धर्मवीर पतसंस्थेची स्थापना केली. गावातील पश्चिम विभागाला यामुळे आर्थिक बळ मिळाले.

स्व.गुलाबराव डेरे, स्व.वसंतराव देशमुख यांच्या नंतर शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे अध्यक्ष प्रवीण गुलाबराव डेरे पाटील, उपाध्यक्ष मेहबूब काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर औटी, संचालक सुभाष दरंदाळे, कैलास औटी,राजेंद्र कोल्हे, एकनाथ तांबे, संजय देशमुख, हेमंत कोल्हे, हितेश श्रीवत, काशिनाथ आल्हाट,राजू लोखंडे, संध्या गायकवाड, सारिका डेरे, सीताराम खेबडे, योगेश गांधी या संचालक मंडळाने जेष्ठ संस्थापक शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचप्रमाणे गुंजाळवाडी येथे संस्थेचे सभासद खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि आमदार शरद सोनवणे यांच्या उपस्थितीत तिसऱ्या शाखेचे उद्घाटन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी बाजार समितीचे सभापती संजय काळे, जुन्नर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अमित बेनके,जिल्हा परिषद सदस्य गुलाबराव पारखे, जिल्हा परिषद सदस्या नेहाताई पाटे, ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष सुजितभाऊ खैरे,विघ्नहरचे संचालक संतोषनाना खैरे, शिवसेना तालुका प्रमुख योगेश पाटे, माऊली खंडागळे, राजश्रीताई बोरकर, बाजार समितीचे संचालक संतोषदादा चव्हाण, राष्ट्रवादीचे अध्यक्ष विकास दरेकर, पंचायत समिती सदस्य सुषमाताई वाव्हळ, जयश्रीताई बनकर,नारायणगावचे सरपंच डॉ. शुभदाताई वाव्हळ, वारूळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ, गुंजाळवाडीचे सरपंच दिव्याताई सोलाट, सहाय्यक निबंधक गजेंद्र देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. गुंजाळवाडी येथे धर्मवीर संभाजी पतसंस्थेच्या उद्घाटन प्रसंगी गुंजाळवाडीकरांनी चाळीस लाखांच्या ठेवी ठेवून पहिल्याच दिवशी संस्थेवर विश्वास दाखवला आहे.सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष मेहबूब काझी सर यांनी केले असून,सूत्रसंचालन हेमंत कोल्हे यांनी केले तर आभार संचालक राजेश कोल्हे यांनी मानले.

## सुनावणी प्रक्रियेत दस्तऐवजीकरणाला प्राधान्य द्या : शीतल तेली- उगले

■ पुणे(दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील मतदारसंख्या राज्यात सर्वाधिक असून, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यातील काम चांगल्या पद्धतीने पूर्ण करण्यात आले आहे. आता दुसऱ्या टप्प्यात प्राप्त होणाऱ्या दावे व हरकतींवर सुनावणी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ही प्रक्रिया पारदर्शकपणे आणि प्रभावीपणे राबविताना दस्तऐवजीकरणाला प्राधान्य द्यावे, अशा सूचना मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दुसऱ्या टप्प्यातील दावे व हरकतींवरील सुनावणी प्रक्रियेच्या अनुषंगाने मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, रोहयो सहआयुक्त तथा नोडल अधिकारी संजीव पलांडे, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी विक्रांत बगाडे , उपजिल्हाधिकारी मीनल कळसकर आदी उपस्थित होते.

श्रीमती तेली-उगले म्हणाल्या, प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी योग्य नियोजन करून वेळापत्रक निश्चित करावे आणि त्याचे काटेकोरपणे पालन करावे. मतदार यादीतील विसंगती शोधण्याचे काम सुरू करावे. नोटीस बजावताना ती संबंधित मतदारापर्यंत पोहोचेल, याची दक्षता घ्यावी. एकही पात्र मतदार मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून वंचित राहणार नाही, तसेच भारतीय नसलेला अपात्र मतदार यादीत समाविष्ट होणार नाही .

## गणेशोत्सव काळात पुणे शहरातील मध्यवर्ती भागात जड-अवजड वाहनांना वाहतुकीस बंदी

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सव काळात पुणे शहरातील मध्यवर्ती भागात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने वाहतूक सुरक्षित व सुरळीत ठेवण्यासाठी जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(ए)(बी), ११६(४) व ११७ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश निर्गमित केला आहे. दि. १२ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणपती विसर्जनापर्यंत २४ तास खालील रस्त्यांवर जड/अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी राहणार आहे— शास्त्री रोड – सेनादत्त चौकी चौक ते अलका चौक टिळक रोड – जेधे चौक ते अलका चौक कुमठेकर रोड – शनिपार ते अलका चौक लक्ष्मी रोड – संत कबीर चौक ते अलका चौक केळकर रोड – फुटका बुरुज ते अलका चौक बाजीराव रोड – पुरम चौक ते गाडगीळ पुतळा शिवाजी रोड – गाडगीळ पुतळा ते जेधे चौक कर्वे रोड – नळस्टॉप चौक ते खंडोजीबाबा चौक फर्ग्युसन कॉलेज रोड – खंडोजीबाबा चौक ते वीर चाफेकर चौक जंगली महाराज रोड – स. गो. बर्वे चौक ते खंडोजीबाबा चौक सिंहगड रोड – राजाराम ब्रिज ते सावरकर चौक गणेश रोड/मुदलियार रोड – पॉवर हाऊस दारुवाला ते जिजामाता चौक

ते फुटका बुरुज चौक अत्यावश्यक सेवेतील वाहने, जसे की अग्निशमन दलाची वाहने, पोलीस वाहने तसेच गणेश देखावे वाहतूक करणारी वाहने यांना या निर्बंधातून वगळण्यात आले आहे.

## पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी पीएमआरडीएचा ‘मास्टर प्लॅन’ गतिमान करा

■ मुंबई (दै. संध्या)

पुणे जिल्ह्याच्या नियोजित व सर्वांगीण विकासामध्ये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, पीएमआरडीए क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे अधिक वेगाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे पीएमआरडीए क्षेत्रातील विविध विकासकामांचा आढावा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी घेतला. यावेळी पीएमआरडीएच्या माध्यमातून सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विविध प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, सह आयुक्त (प्रशासन) रुपाली आवले-डंबे, सह आयुक्त (जमीन व मालमत्ता) पूनम मेहता, प्रभारी सह आयुक्त (अनधिकृत बांधकाम) हिम्मत खराडे, महानगर नियोजनकार स्मिता कलकुटकी, मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विशेष प्रकल्प रिनाज पठाण, प्रभारी मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी यांच्यासह पीएमआरडीएचे संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात ६७४ गावांचा समावेश असून, सुमारे ५,२१५ चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे. पुणे महानगर प्रदेशाचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि पर्यटनाच्या वाढत्या संधी लक्षात घेऊन पुढील अनेक वर्षांचा विचार करून पायाभूत सुविधांचे नियोजन करावे.

## गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगमुक्त महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार

■ पुणे(दै. संध्या)

गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी किशोरवयीन मुलींच्या प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्राधान्य देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने सुरू केलेल्या ‘गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगमुक्त महाराष्ट्र’ अभियानाला पुणे जिल्ह्यातही गती मिळणार आहे. या अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यात १५ ते २० वयोगटातील मुलींच्या मोफत एचपीव्ही लसीकरणासाठी जिल्हा प्रशासनाने जीविका फाउंडेशनसोबत भागीदारी केली आहे.

राज्यातील महिलांच्या आरोग्याचे संरक्षण आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रतिबंधात्मक उपाय प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले आहे. सातारा, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पालघर आणि वर्धा जिल्ह्यांनंतर पुणे जिल्ह्याचाही या उपक्रमात समावेश झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अभियानाच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींच्या आरोग्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगितले आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, कॉर्पोरेट क्षेत्राने सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. १वेळेवर तपासणी आणि एचपीव्ही लसीकरणामुळे गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेच्या माध्यमातून हा आजार रोखण्यावर शासनाचा भर आहे. पुणे जिल्ह्यातील १५ ते २० वयोगटातील मुलींना मोफत एचपीव्ही लस उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि जीविका फाउंडेशन यांच्यात भागीदारी निश्चित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी आणि जीविका फाउंडेशनचे चेअरमन जिग्नेश पटेल यांच्या समन्वयातून या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राष्ट्रीय धोरणानुसार १४ वर्षे वयाच्या मुलींच्या लसीकरणावर शासनाचा भर आहे. त्यास पूरक म्हणून पुणे जिल्ह्यात १५ ते २० वयोगटातील मुलींचे लसीकरण सीएसआरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात जिल्ह्यातील आकांक्षित तालुक्यांपासून करण्यात येणार असून, त्यानंतर टप्प्याटप्प्याने संपूर्ण जिल्ह्यात लसीकरणाचा विस्तार करण्यात येईल. पात्र एकही मुलगी लसीकरणापासून वंचित राहू नये.

## कृषी प्रशिक्षण आधुनिक तंत्रज्ञानासह ऊस पिकावरील किडी-रोगांबाबत मार्गदर्शन

■ नारायणगाव (दै. संध्या)

कृषि विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत हवेली तालुक्यातील बिवरी येथे शेतकऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणात ऊस पिकावरील किडी व रोग, सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग, हंगामी पिकांचे नियोजन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपसरपंच सुनील गोते यांनी केले. प्रशिक्षणाच्या पहिल्या सत्रात वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे शास्त्रज्ञ समाधान सुरवसे यांनी ऊस पिकावरील पायरीला, खोडकीडा, हुमणी किडी तसेच विविध रोगांबाबत सविस्तर माहिती दिली. सद्यस्थितीत ऊस पिकामध्ये आढळणाऱ्या समस्या, त्यावरील उपाययोजना आणि पीक संरक्षणाच्या प्रभावी पद्धती याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. पुढील सत्रात उपकृषि अधिकारी ए. एन. ढवळे यांनी सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग (PMFME) योजनेची सविस्तर माहिती दिली. वैयक्तिक तसेच गटामार्फत सुरू करता येणाऱ्या विविध उद्योगांची उदाहरणांसह माहिती देत शेतकऱ्यांनी कृषीपूरक व्यवसायाकडे वळण्याचे आवाहन केले.

उपकृषि अधिकारी जी. एम. सुरवसे यांनी हंगामातील विविध पिकांचा विश्लेषणात्मक आढावा घेतला. पिकांची योग्य निवड, लागवड पद्धती, उत्पादन वाढ तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी गावाचे सहाय्यक कृषि अधिकारी आर. एच. तायडे यांनी मान्यवर, मार्गदर्शनकर्ते, उपस्थित अधिकारी व शेतकरी बांधवांचे आभार मानले. त्यानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली व कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी मंडळ कृषि अधिकारी वाघोली पी. डी. घाडगे, उपकृषि अधिकारी पी. डी. डोमे, सहाय्यक कृषि अधिकारी एम. डी. महाडिक, एन. जी. गावित, एस. एस. शिंगोटे, एस. एन. थळकरी, एस. टी. शिंदे, एस. एम. शिंदे, एन. ए. कासारे, पी. एस. गाडे, ए. एन. वंजारी, एम. आर. गर्जे आदी कृषि विभागातील अधिकारी उपस्थित होते. तसेच बिवरीच्या सरपंच उत्कर्षा गोते, ग्रामपंचायत सदस्य जितेश गोते, पोलीस पाटील सागर गोते, भगवंत गोते, शिवाजी गोते, ग्राम कृषि विकास समितीचे सदस्य, धनराज शिंदे उपस्थित होते.